www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ३७ बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# इंडिया मेरीटाईम वीकसाठी केंद्राने मुंबईत कायमचे केंद्र उभारावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## २७ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान नेस्को, गोरेगाव येथे 'इंडिया मेरीटाईम वीक' चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, संतोष पाटील**

भारतीय सागरी क्षेत्राच्या विकासासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'इंडिया मेरीटाइम वीक २०२५' या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारने मुंबई येथे कायमचे केंद्र उभारावे. महाराष्ट्र या केंद्राचा जागतिक स्तरावर विकास करण्याबरोबर इंडिया मेरीटाईम वीक ही थीम जागतिक स्तरावर निर्माण करेल, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यक्त केला. मंत्रालयात आयोजित बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' च्या आयोजनाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.



बैठकीस केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, उपमुख्यमंत्री अजित पवार, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. २७ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नेस्को एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव येथे इंडिया मेरीटाईम वीक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भेट देणार आहेत. तर केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

मुंबईमध्ये आर्थिक विकासाच्या मोठ्या संधी असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाच्या विकासात महाराष्ट्राचा वाटा नेहमीच महत्वाचा राहिलेला आहे. इंडिया मेरीटाईम वीक २०२५ च्या निमित्ताने देशासह राज्याच्या सागरी विकासात मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. सागरी गुंतवणुकीसाठी राज्यात पोषक वातावरण असून या 'मेरीटाईम वीक' मुळे त्यास आणखी चालना मिळेल. जागतिक सागरी क्षेत्रामध्ये देश आणि महाराष्ट्र एक नवी ओळख निर्माण करत आहे. जहाजबांधणी धोरणामुळे राज्यात या क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. देशाच्या सागरी क्षेत्राच्या विकासात महाराष्ट्र नक्कीच महत्त्वाची भूमिका बजावेल. महाराष्ट्र सागरी क्षेत्रात एक नवा अध्याय लिहित आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटीने क्षमतावाढ केली आहे. तर नवीन वाढवण बंदरामुळे विकासाच्या नव्या संधी निर्माण होत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' च्या आयोजनाचा मान महाराष्ट्राला दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानतो. महाराष्ट्र शासन हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सहकार्य करेल. हा कार्यक्रम भव्य आणि जागतिक दर्जाचा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल म्हणाले की, 'मेरीटाइम वीक' सारख्या कार्यक्रमांसाठी मुंबई हे योग्य ठिकाण आहे. महाराष्ट्रात सागरी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी मोठ्या संधी आहेत. त्याचा लाभ देशातील उद्योगांना व्हावा. महाराष्ट्राचे सागरी क्षेत्रातील स्थान महत्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्रालय आणि इंडियन पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारताचे सागरी धोरण, नवोन्मेष, शाश्वत विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समुद्री उद्योग क्षेत्रातील वाढ यावर चर्चा आणि प्रदर्शन करण्याचे हे एक व्यासपीठ ठरणार आहे. यामध्ये अनेक उपप्रकल्प, चर्चासत्र आणि थीम असतील.

या कार्यक्रमास १०० पेक्षा जास्त देश, हजारो प्रतिनिधी आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उद्योग सहभागी होणार असून ५०० हून अधिक प्रदर्शकांसह ७ सहयोगी देशांच्या मंत्रीस्तरीय प्रतिनिधींची उपस्थिती असेल.

# उरण पंचायत समितीच्या 8 गणातील आरक्षणे जाहीर

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण पंचायत समितीच्या एकूण आठ गटातील आरक्षणे सोडत भुसंपादन उपजिल्हाधिकारी अविशकुमार सोनुने यांच्या अध्यक्षतेखाली आणि उरणचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांच्या उपस्थितीत विशेष सभेत सोडत पद्धतीने येथील शालेय विद्यार्थी कु.यज्ञेश चौधरी () रा.केगाव - उरण याच्या हाताने चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आली.

यामध्ये नवघर गण क्रं. - 51 मधील जागेवर (नामप्र सर्वसाधारण ),भेंडखळ गण क्रं.- 52,केगाव गण क्रं.-55 व चाणजे गण क्रं.- 56 या तीन जागांसाठी सर्वसाधारण व जासई गण क्रं.- 53,चिरनेर गण क्रं.- 57व आवरे गण क्रं.-58 साठी या तीन जागा सर्वसाधारण (स्त्री राखीव) अशा आल्या असून,चिर्ले गण क्रं.-54 मध्ये नामप्र (स्त्री राखीव) अशी उरण तालुक्यातील एकूण आठ




पंचायत समिती गणातील आरक्षणे जाहीर करण्यात आली आहेत.दैनिक खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यात आलेल्या उरण पंचायत समितीच्या आरक्षण सोडतीसाठी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील,महसूल नायब तहसीलदार रविंद्र सानप,संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार नरेश पेढवी व निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांच्यासह तालुक्यातील राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने या सोडतीसाठी उपस्थित होते.

# कर्जत - जामखेड मतदारसंघातील १३ वस्त्यांना "वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने" अंतर्गत १०० लाख रुपयांचा निधी मंजूर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई.. संतोष पाटील**

"वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना सन २०२५ - २६" अंतर्गत कर्जत - जामखेड विधानसभा मतदारसंघातील १५ गावातील विविध तांडा, वाडी व वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी १०० लाख रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली.

या योजनेचा उद्देश ग्रामीण व वंचित समाजघटकांच्या वस्त्यांमधील पायाभूत सुविधा सुधारणे, नागरिकांना आवश्यक सोयी - सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हा आहे.

या मंजूर १०० लाख निधीतून कर्जत तालुक्यासाठी ५९ लाख रुपये आणि जामखेड तालुक्यासाठी ४१ लाख रुपये असा निधी विभागला गेला असून, या कामांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या अंतर्गत तांडा, वाडी व वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण, पेव्हर ब्लॉक्स बसविणे, सौरप्रकाश दिव्यांची व्यवस्था, वीजपुरवठा, बसस्टॉप उभारणी आणि अन्य सार्वजनिक सोयीसुविधांची उभारणी करण्यात येणार आहे.

कर्जत तालुक्यातील दुरगाव (गावठाण वस्ती) येथे सौरप्रकाश दिवे बसविणे (₹५.०० लाख), जलालपूर (सटवाई वस्ती) येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (₹७.०० लाख), कुळधरण (वडार वस्ती) येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (₹७.०० लाख), मिरजगाव ( वडार वस्ती) येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (₹७.०० लाख), पिंपळवाडी (देवकाते वस्ती) येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (₹७.०० लाख), तळवडी ताजु ( कडेकर वस्ती ) येथील रस्ता काँक्रीटीकरण (₹७.०० लाख), चिंचोली काळदात ( व्हटकरवाडी ) येथे पेव्हर ब्लॉक बसविणे (₹७.०० लाख), कोरेगाव (सटवाई वाडी) येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे. (₹७.०० लाख), रेहेकुरी येथील चुनखडी वस्तीसाठी वीजपुरवठा करणे (₹५.०० लाख) या नऊ विकासकामांसाठी ५९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

तर जामखेड तालुक्यातील आनंदवाडी (गावठाण वस्ती) येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे (₹८.०० लाख), मोहा (बांगरवस्ती) येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे (₹५.०० लाख), सारोळा (हुलगुंडे वस्ती) येथील अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण (₹८.०० लाख), फक्राबाद (जायभाय वस्ती) येथे सौरप्रकाश दिवे बसविणे (₹५.०० लाख), नाहुली (गर्जे वस्ती) येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे (₹८.०० लाख), खर्डा (वडारवाडा) येथे बंदिस्त गटार करणे ( ₹७.०० लाख) या सहा विकासकामांसाठी ४१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या संदर्भात विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले की, तांडा आणि वस्त्यांचा विकास म्हणजे समाजातील वंचित घटकांना सन्मानाने जगण्याची संधी देणे. शासनाने कर्जत-जामखेड मतदारसंघासाठी दिलेला हा निधी ग्रामीण विकासासाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. या सर्व कामांची अंमलबजावणी दर्जेदार, पारदर्शक आणि जनाभिमुख पद्धतीने करण्यात यावी.

सभापती प्रा.शिंदे यांनी या निधीच्या मंजुरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांचे मनःपूर्वक आभार मानले. ते म्हणाले की, ही योजना तांडा आणि वस्त्यांमधील नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवेल. मूलभूत सुविधा निर्माण होऊन सामाजिक न्याय आणि समान संधीची भावना अधिक दृढ होईल.

# पनवेल महापालिकेच्या भ्रष्ट कारभाराविरोधात ठाकरे गट रस्त्यावर

- जिल्हाप्रमुख शिरीषदादा घरत यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर टाळेबंद
- काम करा नाहीतर खुर्ची सोडा... शिरीषदादा घरतांचा महापालिकेला थेट इशारा
- पनवेलकरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारं प्रशासन आम्हाला नकोय...आक्रमक घोषणाबाजी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल महानगरपालिकेच्या निष्क्रियतेचा आणि भ्रष्ट कारभाराचा निषेध करण्यासाठी आज शिवसेनेने रणसंग्राम छेडला आहे..शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीषदादा घरत यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिकेवर टाळे बंद आंदोलन करण्यात आले...यावेळी पनवेल विधानसभा क्रमांक १८८ मधील सर्व शिवसेना आणि युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते या आंदोलनात जंगी पद्धतीने सहभागी झाले होते.महापालिकेच्या कारभाराने त्रस्त नागरिकांच्या भावना उफाळून आल्या आहेत. अनेकदा निवेदनं देऊनही काहीच हालचाल न झाल्याने अखेर शिवसेना ठाकरे गट रस्त्यावर उतरले आहे.पनवेलकरांच्या हक्कासाठी आम्ही



टाळं लावत आहोत!प्रशासन झोपलंय,पण जनता आता जागी झाली आहे.पनवेल महापालिकेने काम करावं नाहीतर खुर्ची सोडावी...असा इशारा शिरीषदादा घरत यांनी दिला.

शहरातील रस्ते,पाणीपुरवठा,स्वच्छता, आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा या सर्व बाबींवर प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे.जनतेच्या पैशावर चालणारी महापालिका,पण जनतेच्या प्रश्नांकडे पाठ फिरवणारी यंत्रणा हे आम्ही सहन करणार नाही असा घणाघात शिवसेनेने केला आहे. यावेळी पनवेलकरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारं प्रशासन आम्हाला नकोय अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. शेकडो शिवसैनिकांच्या उपस्थितीत झालेलं हे आंदोलन पूर्णतः शिस्तबद्ध आणि ठाम होतं.मात्र, त्या आंदोलनातील आक्रमकतेने महापालिकेच्या अधिकाऱ्यांची धावपळ उडाली.अनेक स्थानिक नागरिकांनीही या लढ्याला पाठिंबा दिला.पनवेलचा विकास कागदावर नको,जमिनीवर हवा..जोपर्यंत प्रशासन जागं होत नाही,तोपर्यंत शिवसेना शांत बसणार नाही... असे शिरीष दादा घरत यांनी सांगितले...आजच्या या आंदोलनाने पुन्हा एकदा सिद्ध केलं की पनवेलच्या राजकारणात अजूनही शिरीषदादा घरत हे नाव म्हणजे संघर्ष, जनआवाज आणि नेतृत्वाचं प्रतीक आहे.

यावेळी शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, जिल्हा प्रमुख शिरीष घरत, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, महानगर संघटक गुरुनाथ पाटील, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, तालुका प्रमुख संदीप तांडेल, शहर प्रमुख प्रवीण जाधव, शहर प्रमुख यतीन देशमुख, शहर प्रमुख सदानंद शिर्के, शहर प्रमुख रामदास गोवारी, शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, शहर प्रमुख गुरु म्हात्रे, शहर प्रमुख प्रदीप केणी, युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, विधानसभा अधिकारी अजय पाटील, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका सौ. रेवती सकपाळ, विधानसभा संघटिका सौ. सुजाता कदम, उपतालुका संघटिका सौ. तनुजा झुरे, उपमहानगर संघटिका सौ. रुपाली कवळे, शहर संपर्क संघटिका सौ. समीक्षा पांगम, सौ. श्रद्धा जाधव, शहर संघटिका सौ. संगीता राऊत, शहर संघटिका सौ. मालती पिंगळा, शहर संघटिका सौ. सामीना कुडाळकर, शहर संघटिका सौ. अर्चना कुळकर्णी, शहर संघटिका सौ. ज्योती मोहिते, शहर संघटिका सौ. संपदा धोंगडे यांच्या सह शिवसेना पदाधिकारी तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विविध योजनांवर आधारित राष्ट्रीय पोस्टर डिझाईन स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ विभाग**

**नागपूर, :** सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने राष्ट्रीय पोस्टर डिझाइन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेची "टर्न व्हिजन इनटू आर्ट डिझाइन द पोस्टर, सेलिब्रेट द डिकेड" अशी थीम ठेवण्यात आली आहे. ही स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे.

मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत अभियान, आत्मनिर्भर भारत, बेटी बचाओ, बेटी पढाओ, स्किल इंडिया, वेव्हज समिट, वातावरण बदल, योगा आदी विषय या स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत.

स्पर्धकांना ए २ आकारातील पोस्टर पीडीएफ, जेपीईजी, पीएनजी (हाय-रेझोल्यूशन) मध्ये www. pmvision२art.com या संकेतस्थळावर 21 ऑक्टोबरपर्यंत अपलोड करायचे आहेत. यासाठी 75 विजेत्यांना पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात येईल.

तसेच त्यांची कलाकृती प्रमुख कला दालनांमध्ये प्रदर्शित केली जाईल. त्याचबरोबर विजेत्यांची कलाकृती एका विशेष कॉफी-टेबल बुकमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे

# अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

भैरवदेव विद्यालय, रिटघर, पनवेल तालुका ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या वतीने 11वी व 12 वी विद्यार्थी विद्यार्थीनी व त्याचे पालक वर्गासाठी क्राईम, गुन्हे, सायबर सुरक्षेततेबद्दल हेल्प नंबर 1930, पोलिस हेल्प नंबर 112, मोबाईलचा दुरुपयोग, याबद्दल एक मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आला होता. या मार्गदर्शन शिबिरासाठी, पनवेल तालुका सहायक पोलीस निरीक्षक गौरव इंगोले यांनी महिला, भगिनी व पालक वर्ग साठी व विद्यार्थी मित्रासाठी योग्य मार्गदर्शन दिले. यावेळी सरपंच सुभाष भोपी यांनी यावेळी देखील मार्गदर्शन केले.



यावेळी ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी, व स्कूल कमिटी सदस्य, रिटघर पोलीस पाटील, मोरबे गाव पोलीस पाटील, खानाव पोलीस पाटील, गावातील समाजसेवक, मुख्याध्यापक, शिक्षक व मोठ्या संख्येने माता, भगिनी व पालक वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.

## रोटरी क्लब तर्फे थेपडे विद्यालयात पुस्तके वाटप



**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

**म्हसावद :** स्वा सै पं ध थेपडे विद्यालयात रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष श्री गिरीष कुलकर्णी,मानद सचिव श्री सुभाष भाऊ अमळनेरकर, ज्येष्ठ रोटेरियन श्री योगेश दादा गांधी, रोटरी सदस्य श्री रितेश जैन, विद्यालयाचे माजी विद्यार्थी मकरंद कुलकर्णी यांचे सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य श्री पी डी चौधरी सर, उपप्राचार्य जी डी बच्छाव सर, पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर यांच्या शुभहस्ते स्वागत करण्यात आले. श्री गिरीष कुलकर्णी यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व विशद केले .तसेच रोटरी क्लब याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार वाढवावे यासाठी त्यांनी स्वलिखित संकल्प चांगला माणूस बनण्याचा हे पुस्तक इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लबच्या संपूर्ण टीम मार्फत वितरण करण्यात आले . याप्रसंगी विद्यालयाचे सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस जे पवार सर व छायाचित्र श्री डी एम सोनवणे सर यांनी केले .

# ड्रोन बंदी कागदावरच; रेवदंडा किनाऱ्यावर गाड्या, दारू आणि सरकारी हफ्त्यांचा जल्लोष !

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा किनाऱ्यावर हुल्लडबाजीचा उफाळा, सरकारी बाबू-खबरीलालांचा “कमिशन गेम” उघडकीस! ग्रामपंचायत मूकदर्शक .रेवदंडा समुद्र किनाऱ्यावर बेधुंद पर्यटकांचा अराजक कारभार दिवसेंदिवस वाढू लागला आहे. सरकारी बंदी असतानाही किनाऱ्यावर ड्रोन उडवणे, चारचाकी वाहनं समुद्रावर घालून धिंगाणा घालणे, दारू पार्टीनंतर बेभान वेगात गाड्या चालवणे अशा घटनांनी स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचा भडका उडाला आहे. सरकारकडून किनाऱ्यांवर ड्रोन उडवण्यास सक्त मनाई असतानाही काही



पर्यटक बिनधास्तपणे वेडिंग शूटिंगच्या नावाखाली ड्रोन उडवतात. हेच नव्हे तर, मोफत शूटिंग करणारे काहीजण स्थानिकांना उलट धाक दाखवतात, दमदाटी करतात हे सर्व खुलेआम सुरू असून स्थानिक प्रशासन व ग्रामपंचायत जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.समुद्रकिनारी दिवसा ,रात्रीच्या वेळी दारू पार्टी, ‘दम मारो दम’सारखी दृश्ये, आणि गाड्यांसोबत समुद्रात घुसणारे पर्यटक या सगळ्यामुळे रेवदंडा किनारा ‘हुल्लडबाजीचा अड्डा’ बनू लागला आहे. “किनाऱ्यावर गाड्या गेल्या की ‘खबरीलाल’ नावाचा एक जण सरकारी बाबूंना फोन करून बोलावतो. त्यानंतर तोच सरकारी बाबू पर्यटकांकडून हफ्ता वसूल करतो, आणि त्यातून खबरीलालला प्रत्येकी गाडीमागे ५०० रुपयांचे कमिशन दिले जाते,” अशी जोरदार चर्चा रेवदंडा परिसरात सुरू आहे. स्थानिक नागरिकांचा सवाल असा आहे की “या गाड्यांना परमिशन देतो कोण? ड्रोन उडवायला बंदी असताना हे ड्रोन कसे उडतात? ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाचं डोळस नियंत्रण कुठं गेलं आहे?”सुट्टीसाठी आलेल्या कुटुंबीयांना, लहान मुलांना, जेष्ठ नागरिकांना या हुल्लडबाजांमुळे धोका निर्माण होत आहे. म्हणूनच रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आचल दलाल यांनी स्वतः लक्ष घालून अशा पर्यटकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी रेवदंडा परिसरातील नागरिकांतून होत आहे. नागरिकांचं म्हणणं स्पष्ट आहे की “प्रशासनाने तातडीने बंदोबस्त केला नाही तर हा समुद्रकिनारा पर्यटकांसाठी नव्हे,गुन्हेगारांसाठी ‘हॉटस्पॉट’ बनेल!”

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाईपलाईन कामामुळे वयाळ लोधिवाली रस्त्याची अवस्था बिकट

### दैनंदिन व आपत्कालीन परिस्थितीत जवाबदार कोण..?

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी खालापूर(साबीर शेख):**

वयाळ ते लोधिवली रस्ता शेवटच्या घटका मोजत असून ग्रामस्थांचा आक्रोश वाढताना दिसत आहे. त्या रस्त्याची दुर्दैवी बिकट अवस्था होण्या मागे महाराष्ट्र जीवन प्रधिकरण जवाबदार असून त्यांच्या प्रकल्पाच्या अति वापरा मुळे ग्रामस्थांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे . दोन-तीन वर्ष पाईपलाईन चा काम चालू असल्यामुळे रस्त्याची अवस्था पूर्णपणे खराब व असुरक्षित झालेली आहे. या प्रकल्पामुळे उद्भवणाऱ्या विविध अडी अडचणीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने गावात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास दुर्दैवाने जीवित हानी झाल्यास जबाबदार कोण असा सवाल ग्रामस्थ करताना दिसत आहे. याबाबत वयाळ ग्रामस्थांनी, ग्रामपंचाय व तहसीलदार यांच्याकडे वारंवार तक्रार करून सुद्धा याची दखल घेतली जात नसल्यानें आज सोमवार







दि.१४ ऑक्टोंबर रोजी खालापूर तहसीलदार, महाराष्ट्र जिवीन प्राधिकरण पनवेल, खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व उरण मतदार संघातील आमदार यांना पत्रक द्वारे निवेदन देत दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार यांनी ग्रामस्थांच्या समस्या जाणून जाणून घेऊन तातडीने बिडिओ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना नोटीस देऊन शुक्रवार दि.१७.१०.२०२५ दुपारी ०३:००वाजत खालापूर तहसील येथे मीटिंग लावण्याचे आश्वासन देण्यात आले. या वेळी वयाळ गावातील उपसरपंच रोशन गायकवाड, प्रमोद पवार,अनिल पवार,अर्जुन पवार,समीर म्हात्रे,रुपेश पवार, अक्षय म्हात्रे, देवा पवार, नितीन ठाकूर, भूषण म्हात्रे,जयेश ठाकूर, सुरेश देशमुख, दिगंबर मापाडी, प्रदीप गायकवाड,राहुल गायकवाड, मारुती पवार, सागर म्हात्रे, प्रमोद म्हात्रे, नारायण पवार, प्रसाद पवार, समिर पवार,जय पवार, संतोष पाटील, अमर ठाकूर, भरत म्हात्रे, अनंता म्हात्रे, रोहित ठाकूर,व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते

## चांदिवलीतील शिवस्मारक मुंबईतील सर्वात प्रेरणादायी वास्तू ठरेल - मंत्री आशिष शेलार

### संघर्षनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या सुशोभीकरणाचे भव्य भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांताराम गुडेकर)**

चांदिवलीतील संघर्षनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या सुशोभीकरणाचे भव्य भूमिपूजन नुकतेच पार पडले. या स्मारकाच्या माध्यमातून स्थानिकांना आपल्या गौरवशाली इतिहास आणि समृद्ध संस्कृतीशी जोडणारी प्रेरणा मिळेल, अशी भावना मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी व्यक्त केली. “हिंदवी स्वराज्याचे प्रणेते छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्रीराम, भारतमाता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींनी सजलेला हा चौक मुंबईतील सर्वात प्रेरणादायी स्थळांपैकी एक ठरेल,” असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.




चांदिवलीतील संघर्षनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन रविवारी मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाले. शिवस्मारक समिती, चांदिवली यांच्या मार्फत आयोजित या कार्यक्रमाला आमदार संजय उपाध्याय, आमदार दिलीप लांडे, शिवसेना विधानसभा प्रमुख अशोक माटेकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोरे, शुभ्रांशु दीक्षित, माजी नगरसेवक सीताराम तिवारी, भाजपाचे पवई मंडळ अध्यक्ष महेश चौगुले आणि जिल्हा कार्यकारणी सदस्य रेश्मा चौगुले आदिसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते, स्थानिक नागरिक उपस्थित होते. या दरम्यान आपल्या भाषणात पालकमंत्री आशिष शेलार म्हणाले, “दिवाळीच्या पवित्र सणात शिवस्मारक समितीच्या माध्यमातून पुण्याचे कार्य घडत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सुशोभीकरण होत असून, या चौकात शिवाजी महाराज, प्रभू श्रीराम, भारतमाता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती असतील. हे ठिकाण मुंबईतील सर्वात प्रेरणादायी स्थळांपैकी एक बनेल.” यावेळी शिवस्मारक समितीचे महेश चौगुले आणि रेश्मा चौगुले यांनी उपस्थित मान्यवरांचा सन्मान केला.

## वळद पुनर्वसन येथे समाज मंदिर लोकार्पण सोहळा व धम्मचक्र परिवर्तन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा तालुक्यातील वळद पुनर्वसन येथे 14 ऑक्टोंबर 2025 ला धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त समाज मंदिर लोकार्पण सोहळा पार पडला . या समाज मंदिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य सीमा रामटेके यांनी केले तर सहउद्घाटक म्हणून बोरकर ग्रामसेवक उपस्थित होते . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संजीव भांबोरे ब्ल्यू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे महाराष्ट्र प्रमुख तथा दैनिक माझा

मराठवाडा चेविदर्भ विभागीय संपादक संजीव भांबोरे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे पंचायत समिती सदस्या काजल चवळे, जगदीश उईके, प्रियंका धुळसे



,मंगेश जनबंधू, ललित मेश्राम, राजू हलमारे, असंख्य मान्यवर उपस्थित होते .

कार्यक्रमाचे संचालन ब्ल्यू टार्म टीव्ही न्यूज चॅनलच्या अँकर संजना भांबोरे यांनी केले तर आभार राजेश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रशांत वंजारी, उपाध्यक्ष शीलवंत खोब्रागडे सचिव कवडू बनसोड, सहसचिव अक्षय खोब्रागडे व मंडळातील सर्व सदस्यांनी सहकार्य केले. त्याचप्रमाणे लोकांच्या मनोरंजनाकरिता प्रबोधनात्मक आर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेल परिसरातील महामार्गावरील धुळीचे कण नाका-तोंडात

### प्रवाशांसह चालक आणि पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

पनवेल परिसरात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच इतर महत्वाच्या बांधकामामुळे त्याचप्रमाणे विविध रस्त्याच्या कामामुळे धुळीचे कण येथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांसह चालक आणि पादचाऱ्यांच्या नाका-तोंडात जात आहेत. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

पनवेल परिसरातील अनेक विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्याचप्रमाणे अनेक रस्त्यांची कामे ही जोरात सुरू आहेत. नुकत्याच झालेल्या पावसाळ्यात अनेक रस्त्यांना खड्डे पडल्याने तेथे माती, खडी टाकून खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले होते. पावसाळ्यात चिखलातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली होती. परंतु सध्या हे धुळीचे कण अनेकांच्या नाका-तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. दुचाकी चालकासह तीन चाकी, चारचाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे. अनेकांना श्वसनाचे आजार निर्माण होण्याची भीती निर्माण झाली असून, काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहेत. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

# शिक्षक असण्याची पहिली अट 'विद्यार्थी' असणे हीच आहे - विलासराव देशमुख

### मुख्याध्यापक श्री.शरद उद्धवराव जंगाले सरांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभ

**दैनिक युवक आधार**
**अक्कलकोट (रवींद्र मालुसरे) :**

माणसांचं मोठेपण तो किती मोठा झाला यापेक्षा त्याने किती लोकांना मोठे केले यावर त्यांचे मोठेपण मोजले जाते. शिक्षण देणे हे आपल्या जीवनाचे धेय्य आहे आणि ज्ञानदानाचे समर्पण करणे हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे मनोमन स्वीकारलेल्या जंगाले गुरुजींच्या शैक्षणिक सेवा कार्याची महानता भावी पिढीला आदर्शवत अन प्रेरणादायी ठरेल अशीच आहे. शिक्षण हे संस्कृती संवर्धनाचे साधन आहे, तर शिक्षक हा संस्कृतीचा साधक आहे. ही वृत्ती सरांनी आयुष्यभर जोपासली त्याचा मी गेल्या चार दशकांचा साक्षीदार आहे असे उदगार मराठा मंदिर या संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी काढले. मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मला राजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे मुख्याध्यापक श्री.शरद उद्धवराव जंगाले सरांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. मोठया संख्येने उपस्थित असलेल्या नागरिक आणि शिक्षकांसमोर जग आणि आधुनिक शिक्षण पद्धती झपाट्याने बदलत असल्याचे मत मांडताना ते आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की, विद्यार्थी जसा निव्वळ परीक्षार्थी असता कामा नये तसा, शिक्षकही निव्वळ 'अर्थार्जनाचे' साधन म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहाणारा असता कामा नये. 'शिक्षक' असण्याची पहिली अट 'विद्यार्थी' असणे हीच आहे.

झपाट्याने बदलणाऱ्या काळात सतत अद्ययावत राहणे हे शिक्षकांसाठी देखील गरजेचे बनले आहे. आज शिक्षणाचे अवमुल्यन केले जात असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. आमच्यावेळी हे कॉम्प्युटर - मोबाईल नव्हते पण मान मर्यादा आणि पावित्र्य होते. आजचा विद्यार्थी संगणकीय तंत्रज्ञान सहज साध्य करून देशापरदेशात अधिक उच्च पदावर पोहोचत आहे. मात्र गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना सध्या लोप पावत आहे. आपल्या मराठा मंदिरच्या मुंबई, अक्कलकोट, जत, पाली, रत्नागिरी येथील सर्व संस्थामधील संस्थाचालक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी परस्परांना पूरक अशी सामंजस्याची भूमिका घेत यशस्वी वाटचाल करीत






आहोत त्याचे दृश्य परिणाम दिसत असल्यामुळे उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे अध्यक्ष योगेश शशिकांत पवार हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यावर्धिनी मराठा मंदिर मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष संतोषजी नलावडे, चिटणीस मनोहर साळवी, म.मं.श्री. शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक सुरेश फडतरे, विद्यमान मुख्याध्यापक राजेश पडवळकर, म.मं. श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला अक्कलकोट या शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक मानसिंग ल. बनसोडे,

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, मुंबईचे उद्योजक ॲड. यश घोसाळकर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभयजी खोबरे,

शहाजी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक बी. जी. शिंदेआदी मान्यवर उपस्थित होते. जांगळेसरांवर प्रेम करणाऱ्या अनेकांनी याप्रसंगी त्यांच्या कार्याला उजाळा दिला आणि निवृत्ती नंतरच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संपूर्ण कार्यक्रमावर 'विद्वान सर्वत्र पूज्यते' असा भाव दिसून येत होता.

सत्काराला उत्तर देताना जंगाले सर भावुक शब्दात म्हणाले, शाळेशी माझ्या सोनेरी आठवणी जोडलेल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीसाठी, त्याचा पहिला कामाचा अनुभव खूप मौल्यवान असतो. या शाळेने मला शिक्षक म्हणून शिकवण्याची पहिली संधी दिली. त्यावेळी मी नवीन होतो आणि अनुभव नव्हता. पण त्यावेळच्या आमच्या संस्थाचालकांनी आणि मुख्याध्यापकांनी मला नेहमीच साथ दिली. मुलांना नीट कसे शिकवायचे, कमकुवत मुलांना वाचन आणि लेखन कसे शिकवायचे या सर्व महत्त्वाच्या गोष्टी मला सांगितल्या. येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मला नेहमीच भरभरून प्रेम दिले. हे सर्व विद्यार्थी माझे विद्यार्थी नसून माझ्याच मुलांसारखे होते. त्यांना नवीन कौशल्ये शिकवली, त्यांना त्यांचे सर्व ज्ञान निरपेक्षपेपणे देण्याचा आणि उत्तम शिक्षण देण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला.

गेल्या काही वर्षात तर मराठा मंदिर विद्यावर्धिनी कमिटीच्या वतीने सर्वांनी फार प्रेम दिले आपुलकी दिली. आम्हाला त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. आम्हाला अधिक शिस्तीने मेहनत करण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शंभुराजे गाटे सर, सौ.अर्चना जाधव मॅडम, तर आभार प्रदर्शन सौ.स्मिता जगदाळे मॅडम यांनी केले.का र्यक्रम आयोजन करण्यात आणि यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री मानसिंग बनसोडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.मनिषा मोरे मॅडम, सौ.प्रमिला पाटील मॅडम, सौ.रेखा चव्हाण मॅडम, सौ.मनिषा तेलगावकर मॅडम, श्री.शहाजी सावंत सर, श्री.विक्रांत गोडसे सर, शिक्षकेतर कर्मचारी श्री. राजेंद्र गोंडाळ, श्रीमती.शारदा साळुंके यांनी विशेष मेहनत घेतली.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# बदलापूर पॅटर्न पाहता महायुतीत शिवसेना धक्का

## खोपोली नगरपरिषद निवडणूकित महायुतीच्या निर्णयावर सर्वांचे लक्ष ; भाजपचे पारडे जड

**दैनिक युवक आधार**
**खोपोली (साबीर शेख) :-**
बदलापूर नगर परिषदेत महायुतीतील शिवसेना वगळता भाजप - राष्ट्रवादी युती निश्चित झाल्याचे समजले जात आहे . यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसल्याचे सांगितले जात आहे .

जिथे शक्य तिथे युती झाली पाहीजेल व जिथे होत नाही तिथे मित्र पक्षासोबत टिका न करता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पाडाव्यात अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने कर्जत खालापूर मतदारसंघांमध्ये असणाऱ्या पालिकेत भाजपची युती नक्की कोणासोबत होईल या निर्णयावर महायुतीतील अनेक नेत्यांचे पुढील काळातील राजकीय भवितव्य ठरेल असे म्हंटले जाते. कारण सत्तेतील स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधीचे प्रमाण ज्या पक्षाचे जास्त त्याच पक्षाचा मतदारसंघातील प्रभाव अधिक असतो ,ज्याने पुढील राज्य व केंद्रातील निवडणुकीत त्या पक्षाला संधी उपलब्ध होत असते. यामुळे अनेक राजकीय नेत्यांनी हि युती भाजप सोबत टिकवण्यासाठी इच्छा व्यक्त केलेली पहायला मिळत आहे.

बदलापूर पॅटर्न पाहता खोपोली शहरातील महायुती मधील पक्ष अशाच प्रकारे भविष्यात निर्णय घेणार असून स्थानिक कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊनच युती केली जाईल असे समजते. आगामी होत असलेल्या नगरपरिषद निवडणूकित भाजप पक्ष कुठल्या पक्षाची युती करेल या कडे महायुती मधील मित्र पक्षाचे व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बदलापूर पॅटर्नच्या युतीमध्ये शिवसेनेला न विचारता घेता हा निर्णय झाल्याच्या प्रतिक्रिया सेने गटाकडून ऐकताना मिळत असून तिकडे स्वबळावर शिवसेना निवडणूक लढणार असल्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे .

बदलापूर पॅटर्न नंतर आता कर्जत खालापूर मतदारसंघांमध्ये खोपोली शहर शिवसेना व राष्ट्रवादी सुद्धा महायुतीत भाजप सोबत जाताना कुठल्या तडजोडी करतील व त्यावर भाजप पक्ष श्रेष्टीचे काय निर्णय होईल यावर अनेक वेगळीच समीकरणे दिसतील . दोन्ही मित्र पक्षाची भाजपसोबत युती करण्यासाठी इच्छा जग जाहीर असून यामुळे भाजपचे पारडे जड झाले असल्याचे दिसत आहे. यामुळे महायुती मध्ये खोपोली नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भाजप चिन्हाने निवडणूक लढवेल अशी काही चर्चा राजकीय जाणकारांन कडून केली जात आहे .

भाजप पक्ष श्रेष्ठी खोपोली नगर परिषदेतील निवडणूक युतीची हाथ मिळवणी करताना महायुती धर्म पाळणाऱ्यां शिवसेना गटाशी युती करतील की विधानसभेच्या वेळी महायुती मधून बाहेर पडून अपक्ष म्हणून बंडखोरी करणाऱ्या आताच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हाप्रमुख सुधाकर घारे यांच्या प्रभावी नेतृत्वाला पाहून युती




करतील अश्या हि काही महत्वपूर्ण चर्चेला यामुळे उधान आले आहे. यामुळे राजकरणातील चाणक्य समजले जाणारे महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नगर परिषदेच्या निवडणुकीत ते युती धर्म पाळणाऱ्या नेत्यांना कशाप्रकारे न्याय देतील व हि युती पुढील काळात हि कश्या प्रकारे अभेद्य ठरतील याकडे घटक पक्षातील नेते व शहरातील बुद्धीजिवी सुज्ञा मतदार लक्ष ठेवून आहेत .

बदलापूर पॅटर्न नुसार जर भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस यांना सोबत घेतल्यास शहरातील राजकारणात एक अगळे वेगळे समीकरण पाहायला मिळेल तर दुसरीकडे विधानसभेत महायुती धर्म पाळणाऱ्या शिवसेनाला मात्र स्वबळावर स्वतंत्र निवडणूक लढवावी लागेल.याउलट भाजपने शिवसेनेला सोबत घेतल्यास माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांनी आत्तापर्यंत मिळून दिलेल्या खोपोली नगर परिषदेच्या विकासासाठी भरमसाठ शेकडो कोटींच्या निधीमुळे शहराच्या विकासाची गति अधिक होण्यासाठी निवडणूकित भाजप सेना या नैसर्गिक युतीतून प्रलंबित पुढच्या अनेक विकासांना गती मिळेल व ऐतिहासिक निर्णय घेण्यासाठी हि नैसर्गिक युती महत्वाची ठरेल असे हिंदुत्ववादी समविचाराच्या समर्थकांनी शक्यता वर्तवली आहे. हि युती टिकण्यासाठी मात्र नगराध्यक्ष पदाचा उमेदवार त्यावेळी नक्की कोणत्या पक्षाचा असेल या वरून एकमन होणे हि तितकेच अडचणीचे जाणार असल्याचे समजले जात आहे या सर्व बाबींमुळे एकच लक्षात येत आहे की स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप कडून युतीच्या निर्णयाची अंतिम दिशा आगामी काळात पालिकेत नगराध्यक्ष निवडून आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका म्हणून पाहिले जाईल .हि निवडणूक जरी स्थानिक स्वराज्य संस्थेची असली तरी याचा परिणाम पुढील विधानसभा व लोकसभेच्या वेळेस नक्कीच आत्ताच्या युतीवर अवलंबून असेल कारण भविष्यात सत्तेतील आमदार व खासदार आपल्या राजकीय अस्तित्वासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आपली ताकद कशी वाढेल यासाठी प्रयत्न करताना दिसतील .मागील गमावलेली संधी यंदा विजयस्वरूपी व्हावी यासाठी भाजप खोपोली मंडळातील प्रमुख नेतृत्व पक्षश्रेष्टींकडे याबाबत स्थानिक घडामोडीचा आढावा देत चर्चा करत असून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भाजपचाच व्हावा यासाठी आग्रही असताना हि दिसत आहे .यावर प्रतिक्रिया घेताना शहराच्या विकासाला गती देण्यासाठी देवेंद्रजींच्या नेतृत्वाची , रवींद्र जी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाची व आमदार प्रशांत ठाकूर तसेच जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली लवकरच योग्य ते निर्णय होतील आणि तो निर्णय आमच्यासाठी अंतिम असेल असे खोपोली भाजप जेष्ठ नेते यशवंत साबळे यांनी सांगत भाजप स्वबळावर सुद्धा निवडणूक लढवण्यासाठी सक्षम आहे , यासाठी आम्ही आमच्या संघटनात्मक बळाचे अहवाल सुद्धा सादर करत आहोत ,नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भाजप पक्षाचाच व्हावा अशी आमची व संपूर्ण खोपोलीतील सुज्ञ नागरिकांची ही इच्छा आहे. शहर मंडळ म्हणून आम्ही हि भावना शिश नेतृवा कडे सातत्याने व्यक्त केली असल्याने खोपोली नगर परिषदेवर यंदा भाजपचाच झेंडा फडकेलं असा विश्वास हि साबळे यांनी व्यक्त केला.



बोररांजणी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना शिवारात मोसंबी पिकाचे पंचनामे करताना तलाठी हैबते मॅडम, ग्रामसेवक मानकर, कृषी सहाय्यक तनपुरे, सरपंच रामभाऊ जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी नागेश कावरे व इतर शेतकरी यांचं घेतलेलं छायाचित्र.

( छाया-एकनाथ जाधव घनसावंगी तालुका प्रतिनिधी दैनिक युवक आधार)

## श्रीवर्धन नगरपरिषद निवडणूक 2025 : युतीच्या चर्चांना उधाण — सर्व राजकीय पक्षांची मात्र सावध भूमिका

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी :- अनिकेत मोहित**

आगामी श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीचे आरक्षण जाहीर होताच स्थानिक राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या रणनिती आखण्यास सुरुवात केली असून, युती आणि आघाड्यांच्या चर्चांना देखील जोर आला आहे. विशेषतः शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि शिवसेना (एकनाथ शिंदे ) या दोन्ही पक्षांच्या संभाव्य युतीबाबत राजकीय वर्तुळात चर्चेचा जोर वाढला आहे.




मात्र या सर्व चर्चांना पूर्णविराम देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे श्रीवर्धन शहर उपाध्यक्ष अजिंकेश भाटकर यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यांनी सांगितले की,

“कोणत्याही पक्षासोबत युतीबाबत आमचा कोणताही विचार नाही. पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल. मात्र सध्या सुरू असलेल्या युतीच्या चर्चांना आम्ही कोणताही दुजोरा देत नाही. जर काही निर्णय झाला, तर त्याची अधिकृत घोषणा आमच्या पक्षाकडून करण्यात येईल.”

या वक्तव्यामुळे श्रीवर्धनमधील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना तोंड फुटले आहे. स्थानिक स्तरावर दोन्ही शिवसेना पक्ष आपापली ताकद दाखवण्याच्या तयारीत आहेत. नगरपरिषद निवडणुकीत कोणता पक्ष वरचढ ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

श्रीवर्धनमधील राजकीय वातावरण आता दिवसेंदिवस तापत असून, आगामी काळात या निवडणुकीचा थरार अधिक चुरशीचा होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

## जीवनातील विविध प्रसंग,घटना अचुक सांगणारे लोखंडे महाराज

**दैनिक युवक आधार**
**बीड पाटोदा प्रतिनिधी :**

**मारुती सत्रे** : राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला एक अदभुत किमया अवगत आहे. लोखंडे महाराज आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षमधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात. एवढेच नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. पाटोदाजवळ असलेल्या दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही



वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्या निमीत्ताने पाटोदा शहरात आले आणि येथेच स्थायिक झाले. शाळेत असल्या पासुनच राजेंद्र लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत. काहीसे गुढ वागत, त्यावेळी खेमानंद महाराज यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले होते. पाटोद्यात आल्यानंतर त्यांनी एम.ए.पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत नोकरी ही केली मात्र त्यांच्या अध्यात्माकडेच अधिक कल राहीला. महाराज ब्रम्हचारी आहेत.दरम्यान त्यांच्या या गुढ

वागणुकीतुनच त्यांच्यातील अनोख्या तर्कशक्तीची जाण होऊ लागली.एकादा अनोळखी व्यक्ती जरी त्यांच्यासमोर गेला आणि त्यांना वाटले तर ते व्यक्तिची जन्मतारीख वारासह अगदी अचुकपणे सांगतात.त्यांच्या तारखेच्या तर्कशास्त्रानुसार त्या व्यक्तिच्या जीवनात भविष्यत घडू शकणाऱ्याही काही घटनांचा वेध सांगु शकतात.वर्तविलेले अंदाज खरे ठरू लागले आहेत. माजी मंत्री आ.धनजंय मुंडे व लोकनेत्या पंकजाताई मुंडे हे बहीणभाऊ मार्च २०२४ मध्ये राजकारणात एकत्रीत येतील असा २०२० साली (चार वर्षापुर्वी) भविष्य सांगणारे लोखंडे महाराज आहेत.मानवी जीवनातील गूढ वागुणुकीचे तर्कशास्त्र लोखंडे महाराज यांना अवगत आहे. मनुष्याचा फक्त चेहरा पाहून ते जन्मतारखेपासून, मृत्युच्या तारखे पर्यंतचा जीवनपट सांगतात,लोखंडे महाराजांनी राज्याच्या व बीड जिल्हयाच्या राजकारणावर आपले अंदाज व मत नोंदवले २०४० साली नोव्हेंबर

महीन्यात ४ तारखेला दिवाळी आहे.त्यादिवशी रविवार असेल, २०५५ साली २४ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री बुधवार रोजी असेल, १९४७ साली ६ मार्च रोजी होळीचा सण होता.तो दिवस बुधवारचा होता.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तो वार शुक्रवार होता अशा प्रकारे पुढील व मागील ५० वर्ष आणि त्याहीपेक्षा अधिक वर्षातील सणांच्या तारखा अगदी क्षणात कुणी बिनचुक सांगु शकेल यावर कोणाचा चटकन विश्वास बसणार नाही मात्र पाटोदा येथील राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला मात्र ही अदभुत किमया अवगत आहे. पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाकडे जाणाऱ्या रोडवर लोखंडे महाराज राहतात.बालवयात लोखंडे महाराजांवर धार्मिक संस्कार झाले असल्यामुळे अध्यात्माची चांगल्या प्रकारे त्यांना आवड निर्माण झाली आहे. भगवान शंकराचे ते भक्त आहेत.त्यांना भविष्य जाणण्याची विद्या प्राप्त झाली आहे . माणसाचा जन्मदिनांक, वेळ,तारीख ते अचूकपणे सांगतात. आपल्याकडे हस्तरेषा किंवा चेहरापाहून भविष्य सांगणारी माणसं आहेत पण ज्योतिष शास्त्राचा कसलाही अभ्यास न करता लोखंडे महाराज माणसाच्या जीवनाबाबत ज्या गोष्टी सांगतात हे मात्र आश्चर्यपेक्षा कमी नाही.

## आयुष्याशी झगडताना जीवनात घडलेल्या भावनात्मक प्रसंगांच्या आठवणीही झाल्या जाग्या

**दैनिक युवक आधार**
महाराष्ट्र प्रतिनिधी

घरी कुटुंबाचे प्रेम आणि माया नातवंडांचा सहवास तरीपण मैत्रीचे नाते काही वेगळेच असते. 48 वर्षाची अतूट मैत्री. कि या मैत्रीचे रक्ताचे नाते नसताना देखील ही मैत्री आपुलकीचे व जिव्हाळ्याचे नातं निर्माण करते. ही खरी मैत्री. आणि त्याचे कारणही तसेच आहे.

उरण तालुक्यातील को. एसो. च्या सेकंडरी स्कूल चिरनेर शाळेच्या 1976 -77 च्या एसएससी बॅचच्या विद्यार्थी- विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा अर्थात गेट-टुगेदर कार्यक्रम तालुक्यातील चिरनेर येथील सरपंच भास्कर मोकल यांच्या रेवती फार्म हाऊस येथे शाळेच्या जुन्या गोड आठवणींत रविवारी (दि.12) संपन्न झाला. आणि चिरनेर शाळेतून दहावी पास होऊन गेलेले विद्यार्थी जवळजवळ 48 वर्षांनी एकत्र आले. या स्नेह मेळाव्याला सरपंच भास्कर मोकल व या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांना त्यावेळी अध्यापन करणारे गुरुवर्य गजानन चौलकर यांना या स्नेहमेळाव्यासाठी खास पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. आरंभी गणेश पूजन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ केला. त्यानंतर सरपंच भास्कर मोकल व शाळेतील गुरुवर्य गजानन चौलकर (सर) यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



सो. च्या सेकंडरी स्कूल चिरनेर शाळेच्या 1976 -77 च्या एसएससी बॅचच्या विद्यार्थी- विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा अर्थात गेट-टुगेदर कार्यक्रम तालुक्यातील चिरनेर येथील सरपंच भास्कर मोकल यांच्या रेवती फार्म हाऊस येथे शाळेच्या जुन्या गोड आठवणींत रविवारी दि.12 रोजी संपन्न झाला. आणि चिरनेर शाळेतून दहावी पास होऊन गेलेले विद्यार्थी जवळजवळ 48 वर्षांनी एकत्र आले.

या स्नेह मेळाव्याला सरपंच भास्कर मोकल व या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांना त्यावेळी अध्यापन करणारे गुरुवर्य गजानन चौलकर यांना या स्नेहमेळाव्यासाठी खास पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते.


गणेश पूजन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला शुभारंभ करण्यात आला, त्यानंतर सरपंच भास्कर मोकल व शाळेतील गुरुवर्य गजानन चौलकर (सर) यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. दरम्यान शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, सर्वांनीच एकमेकांशी गमतीदार संवाद साधले. मात्र आयुष्याशी झगडताना जीवनात घडलेल्या भावनात्मक प्रसंगांचीही यावेळी सर्वांनी आठवण करून दिली. या स्नेहमेळाव्यासाठी सुधाकर नाईक, भालचंद्र पाटील, प्रकाश पाटील, पद्माकर मोकल, चंद्रकांत फोफेरकर, चंद्रकांत पाटील, हेमचंद्र पाटील, चांगुणा नाईक, कमला मोकल, सविता पाटील, विठा नाईक, पुष्पलता पाटील, कलावती शेटे, गोपीचंद ठाकूर, रामदास म्हात्रे ,धाया कामोठकर, अनंत माळी, अनंत म्हात्रे, लहू नाईक, शरद नाईक, हरिभाऊ नाईक, तळीराम नाईक, काशिनाथ पाटील, हरि पाटील, जयवंत पाटील, कमळाकर म्हात्रे, श्रीनंद म्हात्रे, बाळकृष्ण ठाकूर, विजय ठाकूर, धर्माजी ठाकूर, सुरेश मोकल, किशोर मोकल, मनोहर मोकल, भालचंद्र हातनोलकर, बाळकृष्ण म्हात्रे, कृष्णा म्हात्रे, रोहिदास म्हात्रे, सुरेश भोईर आदी दहावी बॅचचे विद्यार्थी या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने एकत्र येत, शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देऊन, या शालेय सवंगड्यांनी आपल्या जीवन प्रवासातील चांगले वाईट अनुभव देखील एकमेकांसोबत शेअर केले.

## घाटंजीच्या विकासासाठी नवा युवा चेहरा: निखिल देठे यांचं नाव नगराध्यक्ष पदासाठी चर्चेत

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि**
**महेश पेन्दोर**

घाटंजी शहरामध्ये एक नवा, तरुण आणि झपाटलेला चेहरा सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे — निखिल देठे! सामाजिक कार्य, युवक नेतृत्व आणि जनतेच्या समस्या सोडवण्याची तळमळ यामुळे निखिल देठे हे नाव सध्या नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत आघाडीवर आहे.

छत्रपती मोहत्सवाच्या माध्यमातून त्यांनी रुग्णसेवा, अन्नदान, पुरग्रस्तांसाठी



मदत अशा विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. सोलापूर व सांगलीतील पूरग्रस्तांसाठी अशा अनेक ठिकाणी मदत देत सामाजिक कार्य केले आहेत..

निखिल देठे यांचं काम केवळ मोहत्सवापुरतं मर्यादित नाही, तर सामाजिक प्रश्नांवर थेट झुगारून ते गरजूंपर्यंत पोहोचतात. कोणत्याही अधिकाऱ्यापुढे, राजकीय नेत्यापुढे गरिबांची भूमिका ठामपणे मांडतात आणि योग्य तो न्याय मिळवून देतात. अशा लोकहितवादी भूमिकेमुळेच ते ‘जनतेचा नेता’म्हणून उदयाला आले आहेत.

अन्नदान छत्राचे मुख्य चालक सूरज हेमके यांसारख्या कार्यकर्त्यांनाही मदतीचा हात देणारे निखिल, अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन एक नवा बदल घडवत आहेत. त्यांच्या नेतृत्वात घाटंजीमध्ये सकारात्मक घडामोडी घडतील, अशी आशा आता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी त्यांची उमेदवारी ही केवळ राजकीय नाही, तर सामाजिक परिवर्तनाची सुरुवात ठरू शकते, असं चित्र आता तयार होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# जागतिक वारसा असणारे ‘घारापुरी’ बेट अंधारात ?

## घारापुरीकरांचा रोष आता विजे पेक्षाही प्रखर

**दैनिक युंवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ ‘घारापुरी’ बेट आज पुन्हा अंधारात बुडालं आहे! महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) निष्क्रिय आणि बेजबाबदार कारभारामुळे गेल्या काही महिन्यांपासून घारापुरी बेटावरील वीज पुरवठा वारंवार खंडित होत असून, ग्रामस्थ आणि व्यावसायिक अक्षरशः हैराण झाले आहेत. ग्रामपंचायतीने 2021 पासून वारंवार पत्रव्यवहार करूनही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कानाडोळाच केल्याने ग्रामपंचायतीचा आणि स्थानिक ग्रामस्थांचा संयम सुटला असून संताप उसळला आहे.



घारापुरी हे जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ असून चारही बाजूंनी समुद्राने वेढलेले बेट आहे. स्वातंत्र्यानंतर दशके या बेटावर वीज नव्हती. अखेर 2018 मध्ये समुद्रातून सबमरीन केबल टाकून बेटावर कायमस्वरूपी वीज पुरवठा सुरू करण्यात आला आणि घारापुरीच्या सौंदर्यात भर पडली. मात्र आज सहा वर्षांनंतर या विजेचा उजेडच मंदावला आहे. वीज वारंवार खंडित होत असल्याने बेटावरील नागरिक, व्यापारी आणि पर्यटक त्रस्त झाले आहेत. मोटार पंप बंद पडल्यामुळे ग्रामपंचायतीला ग्रामस्थांना पिण्याचे पाणी देणेही शक्य होत नाही. वीज खंडित होण्याबाबत ना ग्रामपंचायतीला सूचना दिल्या जातात, ना ग्राहकांना माहिती दिली जाते. घारापुरी येथे महावितरणचे एकही अधिकारी किंवा कर्मचारी कायमस्वरूपी राहत नसल्याने वीज गेली की ग्रामस्थांना ग्रामपंचायतीकडे धाव घ्यावी लागते. ग्रामस्थांना विचारायला कोणी नसते, वीज दुरुस्ती करायला कोणी नसते, आणि महावितरण कार्यालयातून मिळते ती केवळ उद्या–परवाची आश्वासने! त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, “आता पुरे झालं, वीज नसेल तर आंदोलन होईल,” अशा शब्दांत संताप व्यक्तहोत आहे.

घारापुरी हे जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ असून चारही बाजूंनी समुद्राने वेढलेले बेट आहे. स्वातंत्र्यानंतर दशके या बेटावर वीज नव्हती. अखेर 2018 मध्ये समुद्रातून सबमरीन केबल टाकून बेटावर कायमस्वरूपी वीज पुरवठा सुरू करण्यात आला आणि घारापुरीच्या सौंदर्यात भर पडली. मात्र आज सहा वर्षांनंतर या विजेचा उजेडच मंदावला आहे. वीज वारंवार खंडित होत असल्याने बेटावरील नागरिक, व्यापारी आणि पर्यटक त्रस्त झाले आहेत. मोटार पंप बंद पडल्यामुळे ग्रामपंचायतीला ग्रामस्थांना पिण्याचे पाणी देणेही शक्य होत नाही. वीज खंडित होण्याबाबत ना ग्रामपंचायतीला सूचना दिल्या जातात, ना ग्राहकांना माहिती दिली जाते. घारापुरी येथे महावितरणचे एकही अधिकारी किंवा कर्मचारी कायमस्वरूपी राहत नसल्याने वीज गेली की ग्रामस्थांना ग्रामपंचायतीकडे धाव घ्यावी लागते. ग्रामस्थांना विचारायला कोणी नसते, वीज दुरुस्ती करायला कोणी नसते, आणि महावितरण कार्यालयातून मिळते ती केवळ उद्या–परवाची आश्वासने! त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, “आता पुरे झालं, वीज नसेल तर आंदोलन होईल,” अशा शब्दांत संताप व्यक्त केला जात आहे.

ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसारआणि दिलेल्या माहितीनुसार, सबमरीन केबलपैकी काही भाग दोन वर्षांपूर्वी दुरुस्त करण्यात आला होता, परंतु त्यानंतरपासूनच विजेचा पुरवठा सतत खंडित होतो आहे. या समस्येबाबत ग्रामपंचायतीच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या पनवेल कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन अनेक वेळा तक्रारी केल्या, मात्र “लवकरच प्रश्न मार्गी लावू” या आश्वासनावरच प्रकरण अडकले आहे. दोन ते तीन वर्षे उलटून गेली, तरी काहीही सुधारणा झालेली नाही.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, न्हावा टी. एस. रहमान येथून येणाऱ्या ३३ केव्ही क्षमतेच्या वीजवाहिनी ऐवजी आता घारापुरीला केवळ २२ केव्ही क्षमतेची केबल जोडण्यात आल्याचे समजते. त्यामुळे वीज पुरवठा अधिकच अस्थिर झाला असून वारंवार खंडित होतो आहे. हे बदल कोणाच्या आदेशाने व कोणाच्या मंजुरीने करण्यात आले, याबाबत ग्रामपंचायतीने महावितरणकडे स्पष्टीकरण मागितले. घारापुरीचे उपसरपंच श्री. बळीराम पद्माकर ठाकुर व सरपंच सौ. मीना मुकेश भोईर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, “घारापुरीला मिळालेली वीज कायमस्वरूपी राहावी हीच ग्रामस्थांची अपेक्षा होती. मात्र महावितरण अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे आज आम्हाला पुन्हा अंधारात जगावे लागत आहे. वीज प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर ग्रामस्थांचा रोष आंदोलनात परिवर्तित होईल.”

वीज पुरवठा सुरू झाल्यानंतर घारापुरीच्या विकासाला नवी गती मिळाली होती. पर्यटक, स्थानिक व्यवसाय, पाणीपुरवठा आणि सुरक्षेची साधने या सर्व गोष्टी विजेवरच अवलंबून आहेत. पण महावितरणच्या निष्क्रिय कारभारामुळे हा सर्व विकास पुन्हा मागे खेचला जात आहे. ग्रामस्थांचा एकच सवाल “वीज नसली तरी आम्ही झुकणार नाही; आमच्या बेटाचा प्रकाश आम्ही परत मिळवणारच!” घारापुरीकरांचा रोष आताविजे पेक्षाही प्रखर होत असून, महावितरणने त्वरित अधिकारी नेमून केबल दुरुस्तीचे काम हाती घेतले नाही, तर या बेटावर संतापाचा स्फोट होण्याची शक्यता नाकारता येत नाही

# मा. आ. अनिकेत भाई तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय उपयोगी वस्तू वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

**म्हसळा प्रतिनिधी**
**शिरीष समेळ ,**

सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेचा वारसा जपत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लोकप्रिय मा. आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त म्हसळा तालुक्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्यांची मालिका सुरू आहे. त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना, म्हसळा यांच्या वतीने आयोजित “शालेय उपयोगी वस्तू वाटप कार्यक्रम” आज म्हसळा शहरातील जिल्हा परिषद मराठी शाळा आणि जिल्हा परिषद उर्दू शाळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार अनिकेत भाई तटकरे यांचा वाढदिवस साजरा करत विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, रबर, दप्तर अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.या प्रसंगी शालेय समिती अध्यक्ष श्री. बाबू शिर्के, विद्यार्थी संघटना अध्यक्ष शाहनवाज उकये, सलाउद्दीन घराडे, जिब्रान घराडे, तसेच शिक्षकवर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य दिले.



कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना, म्हसळा यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. या उपक्रमातून समाजसेवेचा आणि शिक्षणाविषयी जागरूकतेचा संदेश देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या शुभेच्छापर भाषणात सांगितले की, 'आमदार अनिकेत भाई तटकरे हे नेहमीच समाजातील दुर्बल घटकांसाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कार्यरत असतात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित असा सामाजिक उपक्रम म्हणजेच त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे जिवंत उदाहरण आहे.

# वंदनीय राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवात माकडे, कळंबे, कडूकर सन्मानित

## नागपूर जिल्ह्यातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचा गुरुपुंजात सत्कार

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर** - वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 57 व्या पुण्यतिथी मोहत्सावानिमित्त श्री गुरुदेव प्रचार विभागाच्या वतीने राष्ट्रसंतांच्या साहित्यांचा विविध क्षेत्रांमध्ये ग्राम गीतेंच्या तत्त्वानुसार प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आलेला आहे. नागपूर जिल्ह्यातील अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ प्रचार समितीचे सचिव भैयालाल माकडे खसाळा, नरखेड तालुक्यातील डॉक्टर श्रीमती अर्चनाताई कळंबे, रामटेक तालुक्यातील सौ अमृताताई कडूकर हे जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्यकर्ते ठरले. गुरुदेव सेवा मंडळ सर्वाधिकारी लक्ष्मणरावजी गमे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.




वंदनीय राष्ट्रसंतांच्या ग्रामगीता जीवन परीक्षेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी शिक्षकांना साहित्य पुरविण्यात या कार्यकर्त्यांचा फार मोलाचा वाटा आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत व राष्ट्रसंतांचे साहित्य वाङमय परीक्षा आयोजित करून प्रचारक घडविण्याचे कार्य या कार्यकर्त्यांनी केलेली आहे. व पुढेही असेच अविरत सुरू राहण्याची बिद्र त्यांनी हाती घेतलेली आहे. अशा निष्ठावंत कार्यकर्त्यां चे मनोबल वाढविण्याच्या उद्देशाने हा सत्कार सोहळा दरवर्षी वंदनीय राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सावात पार पडतो. असे प्रसिद्धी पत्रकात कळविले आहे.

# कल्याण फाटा सर्कलवर दादागिरी करणाऱ्या वॉर्डन लोकांना अभय कोणाचे?

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ(ठाणे) घेणार परिवहन मंत्र्यांची भेट.

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत (कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)**

**शिळफाटा(ठाणे):**कल्याण फाटा सर्कल हा नेहमीच वादग्रस्त विषय ठरला आहे कल्याण फाट्यावरील ट्रॅफिक तसेच येथील ट्रॅफिक हवालदार आणि त्यापेक्षाही जास्त येतील वॉर्डन लोकांची दादागिरी याबाबत येथील दक्ष नागरिक संघटना तसेच वेगवेगळ्या सामाजिक संस्था, समाजसेवक यांनी नेहमी ट्रॅफिक विभागाचे अधिकारी तसेच राजकीय लोकांना येथे कशाप्रकारे गैरव्यवहार आणि रात्रीच्या वेळेस तर पूर्णपणे दादागिरी चालते येथील वॉर्डन रात्री दहाच्या नंतर पनवेल कडून येणाऱ्या अवजड वाहनांना सर्कलवर थांबून जबरदस्तीने स्वतः दरवाजा उघडून ड्रायव्हरच्या केबिनमध्ये चढून ड्रायवरांना धमकावून त्यांच्याकडून पैशांची मागणी करीत असतात.

काही दिवसापूर्वी येथील दक्ष नागरिक संघटनेने ट्राफिक विभागाचे डीसीपी श्री.पंकज शिरसाट यांची भेट घेऊन त्यांना पुराव्या सकट कल्याण फाटा सर्कल आणि मुंब्रा बायपास येथील बंद टोलनाक्याजवळ हे वॉर्डन कशाप्रकारे कुठलाही अधिकारी सोबत नसताना ट्रक वाल्यांची लूटमार करतात हे पुराव्या सकट दाखवून दिले होते तरीही ही लूटमार आणि दादागिरी अजून थांबवली जात नाही म्हणजेच डीसीपी पंकज शिरसाट साहेब स्वतः या होणाऱ्या लुटमारीसाठी जबाबदार आहेत असे समजावे



का?असा प्रश्न येथील नागरिक तसेच प्रवाशांना पडला आहे ही लुटमार अशी चालत राहिली तर एक मोठे जन आंदोलन उभे करून येथील वॉर्डन आणि अधिकारी यांना धडा शिकवावा लागेल अशी चर्चा सर्वसामान्य जनतेत होत आहे जर हा प्रकार थांबला नाही तर लवकरच परिवहन मंत्री माननीय श्री. प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन हा सर्व प्रकार त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचा निर्धार राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे ठाणे उप शहर प्रमुख तसेच दैनिक युवक आधार चे पत्रकार रमेश राऊत यांनी केला आहे.कारवाई करण्यास कोणाचाही विरोध नाही पण ती कारवाई कायद्याच्या चौकटीत राहून आणि नियमाचे पालन करून करावी हीच मागणी माननीय परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्याकडे पुरोगामी पत्रकार संघाचे वतीने करण्यात येणार आहे.

# माजी सभापती अशोकनाना काकडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील संघर्ष दिव्यांग समितीच्या वतीने त्यांच्या अभिष्टचिंतन व दिव्यांग मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार सेलू**
**तालुका प्रतिनिधी( ग्रामीण)**
**विठ्ठल राऊत**

पूर्वी असलेला अपंग शब्द वगळून त्यांना दिव्यांग संबोधून त्यांचा आत्मसन्मान वाढवण्याचे व त्यांना आत्मनिर्भर करण्याचे काम देशातील संवेदनशील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे .असे प्रतिपादन राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सेलू येथील कार्यक्रमात बोलतांना स्पष्ट केले .परभणी जी प चे माजी सभापती अशोकराव काकडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील संघर्ष दिव्यांग समितीच्या वतीने त्यांच्या अभिष्टचिंतन व दिव्यांग मेळाव्याचे आयोजन केले होते .

येथील साई नाट्यगृहात दि १२ ऑक्टोबर रोजी आयोजित या कार्यक्रमासाठी उदघाटक म्हणून राज्याच्या राज्यमंत्री ना.मेघना साकोरे बोर्डीकर या होत्या तर अध्यक्ष पदि संघर्ष दिव्यांग समितीचे अध्यक्ष किशोर साळवे होते .प्रा राजाराम झोडगे यांची यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती .मुख्याधिकारी तुकाराम कदम ,के. बा .शिक्षण संस्थेचे सचिव महेशराव खारकर ,बाजार समितीचे संचालक रामेश्वर राठी ,गोपाळ काबरा ,दिनकर वाघ




,ऍड अशोकराव फोफसे ,सचिन धापसे ,मनीष कदम ,नरेंद्र दिशागत ,लक्ष्मण बागल ,रमेश दौड ,माणिकराव घुमरे ,अरूण कोल्हे ,बंडू नाना मुळे ,गोविंदराव गायकवाड ,ज्योतीताई मोगल ,

संध्याताई चिटणीस ,पंकज निकम आदींची यावेळी व्यास पीठावर प्रमुख उपस्थिती होती .

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले .

प्रास्ताविकात कॉ .अशोकराव उफाडे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला .व दिव्यांगाचा विविध प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी दिव्यांग संघटना करीत असलेल्या प्रयत्नाची माहिती दिली .तसेच दिव्यांग बांधवा साठी एक दिव्यांग भवन उभारण्याची मागणी केली राज्यमंत्री ना मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते केक कापून तसेच शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत अशोकराव काकडे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले .यावेळी कै अण्णासाहेब काकडे सेवा भावी संस्थेच्या वतीने अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई साठी ५१,०००/- हजाराचा धनादेश अशोकराव काकडे यांच्या हस्ते मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या कडे सुपूर्द करण्यात आला . यावेळी बोलतांना ना. बोर्डीकर पुढे म्हणाल्या की ,समाजातील उपेक्षित घटकांचा मेळावा घेऊन व त्यांना भेट वस्तू देऊन आपला वाढदिवस साजरा करण्याचा काकडे यांचा हा उपक्रम निश्चित च अभिनंदनीय आहे .एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात परभणी जिल्हा आघाडीवर असून दिव्यांगांचे सर्व अधिकार व न्याय मिळवून देण्यासाठी देखील आपण निश्चित पुढाकार घेऊ .आश्वासन त्यांनी यावेळी दिले .आतापर्यंत आमच्या दिव्यांग बांधवांच्या पाठीशी कुणीही नव्हते परंतु आता अशोक नाना काकडे हे आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले व आमचे बरेच प्रश्न मार्गी लागले आहेत .असे मत यावेळी संघर्ष दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष किशोर साळवे यांनी सांगितले .यावेळी मनोगत व्यक्त करतांना अत्यंत भावुक झाल्या मुळे त्यांना पुढील मनोगत व्यक्त करता आले नाही.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना अशोकराव काकडे म्हणाले की,दिव्यांगाशी आपली नाळ जोडल्या गेली हे मी माझे भाग्य समजतो कारण गरजूंना मदत करण्यासारखा आनंद कुठेच नाही दिव्यांग हे शरीराने जरी दिव्यांग असले तरी मनाने मजबूत असतात हे आपण जवळून पाहिले आहे .भविष्यात देखील त्यांच्या सर्व समस्या सोडवून त्यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी त्यांनी आश्वासीत केले .यावेळी उपस्थित सर्व दिव्यांगना ब्लेंकेट चे वाटप करण्यात आले .दिव्यांगांना नगर परिषदेच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा व निधी वेळेत दिला जाईल असे आश्वा सन यावेळी मुख्याधिकारी तुकाराम कदम यांनी सांगितले .

सर्व जातीचे व धर्माचे मेळावे घेतले जातात परंतु समाजातील दुर्लक्षित असलेल्या दिव्यांगाचा मेळावा कुठे घेतला जात नाही .व तो अशोकराव काकडे यांनी घेऊन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे .देशात जवळपास १० कोटी असलेल्या दिव्यांगाचा संघर्ष नियती बरोबर चालू आहे .दिव्यांग असलेल्या व्यक्ती मनाने दिव्यांग नसतात परिस्थितीवर मात करीत त्यांची जगण्याची धडपड चालू असते .परंतु त्यांना गरज असते ती योग्य साथीची व ती साथ व संधी देण्याचे काम अशोकराव काकडे हे करीत आहेत .शासन दिव्यांगासाठी कायदे व उपाय योजना करते परंतु त्याची अमलबजावणी मात्र प्रभावी पणे होत नसल्याची खंत यावेळी प्रा राजाराम झोडगे यांनी यावेळी मनोगतात व्यक्य केली. दिव्यांनाचे बनावट प्रमाणपत्र घेऊन फायदा उचलणाऱ्या व्यक्तीत देखील दिवसेंदिवस वाढ होत आहे .

त्यामुळे खरे लाभार्थ लाभ मिळण्यापासून वंचित राहतअसल्याचे देखील झोडगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# दादर येथे युवा फाउंडेशन आयोजित विक्री प्रदर्शनाचे राज्यमंत्री योगेशदादा कदम यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:-(प्रमोद तरळ)**

सहकार महर्षी कै.एस.एम.कदम यांच्या स्मृती दिनानिमित्त युवा फाउंडेशन आणि स्व.विनायकराव गायकवाड बिझनेस फोरम यांच्या वतीने प्रथमच दादर येथील छत्रपती शाहू सभागृहात भव्य विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. राज्यमंत्री योगेशदादा कदम यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.या प्रदर्शनाला व्यवसायिक बंधू आणि भगिनींनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. या प्रदर्शनाला जवळपास दीड हजार लोकांनी आपली उपस्थिती दर्शवली.






प्रामुख्याने दापोली, मंडणगड आणि खेड या तीन तालुक्यातील व्यावसायिक बंधू आणि भगिनींना एकत्र आणून त्यांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन युवा फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू,लेडीज ड्रेस मटेरियल, साड्या, कुर्ते,आयुर्वेदिक औषधे,घरगुती मसाले, ड्रायफ्रूट्स,खाद्य पदार्थ, फराळ,अगरबत्ती,आकाश कंदील,तोरणे, डिझाईनर ज्वेलरी,लेडीज आणि जेट्स पर्सेस,होम अप्लायन्स,टॉवेल, रुमाल, टी शर्ट,चष्मे, अक्वागार्ड, सोलर लाईट, इन्शुरन्स,टूर्स अँड ट्रॅव्हल्स,पतसंस्था आदींचे स्टॉल लावण्यात आले होते.

या प्रदर्शनाला आवर्जून उपस्थित राहिलेले राज्यमंत्री योगेशदादा कदम यांनी प्रत्येक स्टॉलवर भेट देऊन संवाद साधला.यावेळी बोलताना त्यांनी आपल्या मतदार संघातील एवढे उद्योजक आपला व्यवसाय करत असल्याचे पाहून समाधान व्यक्त केले. व्यवसायाला अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या अनेक योजना असून त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अनेक व्यावसायिकांना प्रथमच अशा प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी मिळाली. युवा फाउंडेशनच्या वतीने सर्व सहभागी उद्योजकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यात देखील अशा प्रकारचे उपक्रम युवा फाउंडेशनच्या वतीने राबवले जातील तसेच दापोली,मंडणगड, खेड मधील उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे मत फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष सुधीरभाऊ कदम यांनी व्यक्त केले. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा फाउंडेशनच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

# संगणक परिचालकांचे मानधना अभावी बेहाल दिवाळी सारखे सण अंधारात जाणार की काय.?

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

गावचे मंत्रालय संबोधल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयात संगणक परिचालक (केंद्र चालक) म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहेवारी मिळणारे तुटपुंजे मानधन तेही वेळेवर मिळत नसल्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात आर्थिक टंचाईचा सामना करावा लागत आहे.गत जून महिन्यापासून एक दमडी देखील मानधन मिळाले नाही. त्यामुळे संगणक परिचालकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे दरम्यान पुढील काही दिवसात दिवाळी सारखे सणासुदीचे दिवस आहेत, मात्र संगणक परिचालकांना महाराष्ट्र शासनाकडून दिले जाणारे मानधन कधीही वेळेवर मिळत नाही. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयात महत्त्वाची भूमिका बजावणारे संगणक परिचालकांचे पुरते बेहाल होत असल्याचे दिसून येत आहे. सर्व संगणक परिचालकांचे जुलै,ऑगस्ट, सप्टेंबर २०२५ या तीन महिन्याचे मानधन लवकरात लवकर अदा करावे अशी मागणी होत आहे. इन्व्हाईस सारखी जाचक आठ टाकून प्रत्येक केंद्र चालकाचे इन्व्हाईस चुकीचे झाले की, त्या महिन्याचे त्याचे पेमेंट होत नाही. थकित मानधन तात्काळ अदा करावे अशी मागणी श्री भारत आंधळे संगणक परिचालक ग्रामपंचायत खैरखेडा/पिंपळवाडी ता. मालेगाव जिल्हा वाशिम यांनी केली आहे.



# शाम बैसाणे लिखित अभिलाषा कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न

## धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्ताने प्रबोधन काव्यगंध समाज परिवर्तनाचे कवी संमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**( मुंबई / प्रतिनिधी )**

पांचपीर ट्रस्ट कार्यक्षेत्र भारत आयोजित शाम परशुराम बैसाणे लिखित अभिलाषा काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत शिवा इंगोले यांच्या हस्ते व अध्यक्षतेखाली पासपोली बीएमसी शाळा पवई, मुंबई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी बोलताना "शाम बैसाणे यांच्या पहिल्या अभिलाषा काव्यसंग्रहाचे आपण सर्वांनी मनःपूर्वक स्वागत केले पाहिजे. प्रत्येक कवी पहिला तर नवखाच असतो परंतु त्याच्या अवतीभोवतीच्या प्रश्नामधून तो आपल्या कवितेचे आयुष्य घडवीत असतो. खांदेशा सारख्या कष्टाळू भूमीतून शाहू फुले आंबेडकरांच्या प्रेरणादायी विचाराभोवती अभिलाषा काव्यसंग्रह गुंतलेला आहे." असे प्रतिपादन त्यांनी केले. ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत शुक्राचार्य गायकवाड यांनी प्रमुख उपस्थितीत बोलताना "अभिलाषा काव्यसंग्रह पुस्तक प्रकाशन सोहळा देखणा झाला आहे. काव्य संग्रहातील कवितेतून कवी शाम बैसाणे यांनी अनेक




क्षणांना जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे." तर साहित्यिक विचारवंत नवनाथ रणखांबे यांनी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना, "अभिलाषा पुस्तकात शाम बैसाणे यांनी मराठी आणि अहिराणी भाषेत छान कविता लिहिल्या असून त्याला गोडवा आणि लय आहे. त्यांच्या प्रकाशित पुस्तकांने त्यांच्या आयुष्याच्या शिरपेचात एक मानाचा तुरा लावला आहे." असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते भटू जगदेव, प्रा. गीता मोदले, बाबा बिऱ्हाडे पुस्तकावर स्पष्टीकरण आणि विश्लेषण केले. प्रमुख उपस्थितीत बोलताना साहित्यिक अनिल भालेराव, बाळासाहेब बैसाणे यांनी पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल यावेळी शुभेच्छा दिल्या.

दुसऱ्या सत्रात धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने प्रबोधन काव्यगंध समाज परिवर्तनाचे निमंत्रित आणि उपस्थितांचे कवी संमेलन उत्कृष्ठरित्या संपन्न झाले. राजरत्न राजगुरू, गजानन गावंडे , कवी बबन सरोदे, जगदेव भटू , विजयकुमार भोईर, नवनाथ रणखांबे , बाळासाहेब जोंधळे, शाम बैसाणे, सुधाकर सरोदे, नरेश जाधव, मारुती कांबळे, अशोक भवार, सुरेश गोडगे, विकास भंडारे, शाहिर वसंत हिरे, प्रतिक कांबळे, के. पुरुषोत्तम, संतोष सदन, किसन भवाळ आदी. कवींनी मराठी , अहिराणी आणि हिंदी कविता सादर करून कविसंमेलनाची रंगत व उंची वाढवली. यावेळी पंचवीस कवींनी कवी संमेलनात भाग घेतला. कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन आशा व नवनाथ रणखांबे यांनी केले. यावेळी ट्रस्टच्या वतीने राष्ट्रीय साहित्य सेवा पुरस्कार २०२५ देऊन काहीं मान्यवरांचा सन्मान करण्यात आला तर कवी संमेलनात सहभाग घेणाऱ्या कवींना सहभाग सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पांचपीर ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते आणि विशेष मेहनत अंजना बैसाणे, डॉ. सुशील बैसाणे, डॉ. आश्लेषा बैसाणे, भाईदास बैसाणे, डॉ. संतोष मालुसरे, नीलम चौधरी, सुंदर रणदिवे, प्रणिती महापदी, संदीप पाटील, संजना पाटील, राजाराम चौगुले, स्मित पाटील, निलेश बटावले, केविन परेरा, विजय सावंत आदी. मेहनत घेतली.

# कविता तरुणांना विचार करायला प्रवृत करते! :- श्री.प्रमोद गोरकर

## जयभवानी महाविद्यालयात विभागीय काव्यवाचन स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**

मराठी कविता तरुणांना विचार करावयास प्रवृत करते असे प्रतिपादन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.प्रमोद गोरकर यांनी केले. ते पाटोदा येथे जय भवानी महाविद्यालयात आयोजित शिक्षणमहर्षी शिवाजीराव पंडित याच्या वाढदिवसानिमित्त आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धेच्या उद्घाटन सोहळयात उद्घाटक म्हणुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की कविता ही तरुणांच्या अंतरमनातील भावना व्यक्त करण्याचे साधन आहे. कवितेमुळेच तरुण जागृत होऊन काही तरी नवीन शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. नव्या पिढीने नव्या आवाहनाला सामोरी जाणारी कविता लिहावी. असे आवाहन केले. या स्पर्धेच्या प्रमुख अतिथी म्हणुन सुप्रसिध्द कवयित्री श्रीमती रेखा ढेरे (घोलप)




या होत्या. अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन विकास समितीचे सदस्य श्री.दिलीपराव जाधव, प्र. प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ.कल्पना घारगे, प्रा.डॉ. रामकृष्ण प्रधान व परीक्षक म्हणुन प्रा. डॉ.संगिता आहेर, प्रा.डॉ.तबस्सुम इनामदार, व प्रा.डॉ.नामदेव शिनगारे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रारंभी उद्घाटक व पाहुण्यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख अतिथी श्रीमती रेखा ढेरे यांनी मनोगत व्यक्त करताना कवितेने स्त्रीयांना आत्मसन्मान मिळवुन दिला असे सांगितले. व काही सामाजिक आशयाच्या कवितेचे वाचन केले. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी या काव्यवाचन स्पर्धेचा हेतु सांगुन युवकांनी विविध क्षेत्रात प्रगती करावी !असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले. संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी आभार मानले. या प्रसंगी बहुसंख्येने स्पर्धक, विद्यार्थी उपस्थित होते.

# महेंद्रशेठ घरत यांनी प्रेषितला दिली लॅपटॉपरूपी दृष्टी!

## दिव्यांगांना साथ देणे हे कर्तव्य : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

महेंद्रशेठ घरत यांचा दातृत्वाचा महिमा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. 'कैलास मानसरोवर' यात्रेच्या निमित्ताने नुकतेच त्यांनी नेपाळमधील एका दाम्पत्याला घर बांधून देऊन त्याची साक्ष दिली आहे. दिव्यांगांसाठी तर ते कायमच पाठीराखे आहेत.

प्रेषित विनिता बर्फे हा विद्यार्थी उलवे नोडमध्ये राहत असून नववीमध्ये शिकत आहे. तो १०० टक्के दृष्टिहीन आहे. त्याला पुढील शिक्षण सुकर व्हावे, म्हणून विनिता बर्फे यांनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्याकडे ब्रेल लिपीतील लॅपटॉपची मागणी केली होती. महेंद्रशेठ घरत आणि सौ. शुभांगीताई घरत यांनी क्षणाचाही विलंब न लावता प्रेषितला नुकताच अत्याधुनिक असा ब्रेललिपीतील लॅपटॉप भेट म्हणून दिला. त्यामुळे त्याचे आता शिक्षण अधिक सुकर होणार आहे. त्यामुळे महेंद्रशेठ घरत दाम्पत्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरले आहेत.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "गरजवंताला मदत करणे हे माझ्या नसानसांत भिनले आहे. विशेषतः दिव्यांगांबाबत मी




अधिक सकारात्मक विचार करतो. कारण दिव्यांगांचे पालनपोषण करताना पालकांची ससेहोलपट होते. दिव्यांगाच्या जन्मापासूनच त्याच्या आई-वडिलांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते, तरीही ते हार मानत नाहीत. प्रेषित हा गरजू आणि होतकरू विद्यार्थी आहे. तो शंभर ट्क्के दृष्टिहीन आहे. त्यामुळे त्याची शिक्षणातील अडचण मी समजून घेऊन त्याला आता ब्रेललिपीतील लॅपटॉपरूपी दृष्टी दिली आहे. मी माझे कर्तव्य केले आहे. यापूर्वीही मी अनेक दिव्यांगांना सहकार्य केले आहे."

यावेळी लहानपणापासून दृष्टिहीन असलेला प्रेषित म्हणाला, "माझ्या शिक्षणातील अडचण महेंद्रशेठ घरत साहेब यांनी तातडीने सोडविली आहे. त्यांनी मला शब्द दिला होता; परंतु आज त्यांनी तो पूर्ण करून दाखवला. हे उपकार मी कधीही विसरणार नाही. महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई यांचा मी कायमचाच ऋणी राहीन. त्यांचे मनापासून आभार."

# मराठवाडा पूरग्रस्तांसाठी विक्रोळीकरांचा मदतीचा हात

## धान्यवाटप,शालेय साहित्य वाटप,कपडे,आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज)**

अलीकडील मुसळधार पावसामुळे मराठवाडा विभागातील अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी आणि ग्रामीण जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर विक्रोळीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेत देवगाव, साकत आणि कुंभेफळ (ता. परांडा, जि. धाराशिव) या गावांमध्ये धान्य वाटप, आरोग्य तपासणी आणि औषधोपचार शिबिर आयोजित केले.

या मदत कार्यामध्ये स्थानिक नागरिकांसोबत विक्रोळीतील स्वयंसेवकांनी मनापासून सहभाग नोंदविला. शिबिराद्वारे अनेकांना तातडीची वैद्यकीय मदत मिळाली तसेच आवश्यक धान्यसामग्रीचे वितरण करण्यात आले. या मोहिमेच्या यशस्वी आयोजनामागे शंकर (नाना) धमाले आणि पूजा



दळवी यांचे विशेष योगदान राहिले. त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून, पूरग्रस्त भागातील खरी गरज ओळखत योग्य ठिकाणी मदत पोहोचविण्याचे नियोजन केले. यासाठी सर्व स्वयंसेवकांना एकत्र आणून 'विक्रोळीकरांच्या वतीने सेवा करायची संधी' दिल्याबद्दल उपस्थित सर्वांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या कार्यात डॉ. योगेश सुरेश भालेराव , हेमंत पाबळकर , दिनेश साहेब , अमित कांबळे , प्रभाकर षण्मुगम , राजन कोळी , समाधान जाधव, प्रशांत नाईक या उपक्रमाद्वारे विक्रोळीतील नागरिकांनी पुन्हा एकदा आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले असून, "एक हात मदतीचा" या भावनेतून पूरग्रस्तांना दिलासा मिळवून दिला.

# श्रीवर्धन नगरपालिकेच्या भोंगळ कारभारामुळे नागरिक हैराण — रीतसर घरपट्टी भरूनही दाखवली थकबाकी!



**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन नगरपालिकेच्या निष्काळजी व भोंगळ कारभारामुळे शहरातील सामान्य नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. रीतसर घरपट्टी भरूनही नागरिकांच्या नावावर मागील वर्षाची थकबाकी दाखवून पुन्हा कर आकारला जात आहे. परिणामी प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात जेव्हा नागरिकांनी नगरपालिका कार्यालयात चौकशी केली, तेव्हा संबंधित कर्मचाऱ्यांकडून "कॉम्प्युटर सॉफ्टवेअरमध्ये बिघाड झाल्यामुळे ही त्रुटी झाली आहे" हे कारण देण्यात आले. मात्र, या कारणामुळे नागरिकांचा त्रास कमी न होता उलट अधिक वाढला आहे.

"आम्ही वेळेवर कर भरतो, पावत्या आमच्याकडे आहेत, तरीही नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे आम्हालाच त्रास सहन करावा लागत आहे," असा रोष अनेक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

स्थानिक नागरिकांनी नगरपालिकेकडे मागणी केली आहे की, या त्रुटीचे तत्काळ निराकरण करून नागरिकांची चुकीची थकबाकी नोंदणी रद्द करावी आणि भविष्यात अशा त्रुटी टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.

नगरपालिकेच्या या हलगर्जीपणामुळे प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत असून, नागरिकांकडून "हा केवळ सॉफ्टवेअरचा बिघाड नाही, तर व्यवस्थेतील निष्काळजीपणाचे द्योतक आहे" अशा तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

# डिजिटल युगातही मनुष्यत्व जपणारा विद्यार्थीच खरा भारताचा अभिमान"

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ**

देशाच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासात महत्त्वाच्या भूमिका असलेले ,भारताच्या पोखरण-२ अणुचाचण्यांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आणि भारताचे मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे भारताचे ११ वे राष्ट्रपती ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन. हा दिवस म्हणजे केवळ एका व्यक्तीचा जन्मदिन नाही; तर तो दिवस आहे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा, त्यांच्या आशेचा, आणि त्यांच्या क्षमतेच्या जागृतीचा.म्हणूनच हा जागतिक विद्यार्थी दिन आणि वाचक प्रेरणा दिन म्हणुन साजरा केला जातो. "विद्यार्थी" हा शब्द म्हणजे विद्या म्हणजे ज्ञान आणि अर्थार्थी म्हणजे शोधक म्हणजेच ज्ञानाचा शोध घेणारा. विद्यार्थी हा समाजाचा पाया असतो, राष्ट्राचा भविष्यकाळ असतो. प्रत्येक काळानुसार विद्यार्थ्यांच्या विचारात, शिक्षणपद्धतीत आणि जीवनशैलीत बदल होत गेले आहेत. आजचा विद्यार्थी म्हणजे नव्या युगाचा, नव्या तंत्रज्ञानाचा आणि नव्या विचारसरणीचा प्रतिनिधी.

आजचा विद्यार्थी जुना अभ्यासकेंद्रित विद्यार्थी नाही. तो आता जगभरातील माहिती काही सेकंदांत मिळवू शकतो. मोबाइल, इंटरनेट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यासारखी साधने त्याच्याकडे आहेत. तो आता फक्त पुस्तकांपुरता मर्यादित नाही; तर तो प्रत्यक्ष अनुभवातून शिकतो.तो विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, उद्योजकता या सगळ्या क्षेत्रात आपली छाप पाडतो. आजचा विद्यार्थी का? आणि कसे? या प्रश्नांमधून विचार करतो. पूर्वी शिक्षण म्हणजे फक्त शिक्षकांनी सांगितलेले पाठांतर करणे. आज शिक्षण हे क्रियानिष्ठ शिक्षण (Activity-based learning), प्रकल्पाधारित शिक्षण (Project work) आणिव्यावहारिक ज्ञान (Practical knowledge) यावर आधारित आहे. ऑनलाइन क्लासेस, डिजिटल लर्निंग, यूट्यूब लेक्चर्स, आणि ई-बुक्समुळे विद्यार्थी आपल्याला हवी ती माहिती कधीही मिळवू शकतो. यामुळे तो अधिक आत्मनिर्भर आणि स्व-अभ्यासक झाला आहे. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती वाढलेली आहे त्यामुळे तो सर्व गोष्टींचा सखोल विचार करतो, आज त्याच्या मध्ये सृजनशीलता विकसित झालेली आहे त्यामुळे तो नवीन कल्पना, नवोन्मेष आणि प्रयोग करण्याची हिम्मत दाखवतो, आजच्या विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास वाढलेला आढळतो त्यामुळे तो स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवतो.आजच्या विद्यार्थ्यामध्ये आढळणारा सर्वात महत्वाचा गुण म्हणजे सामाजिक जाणिवांची निर्मिती त्यामुळे तो समाजातील अनेक कठीण प्रसंगांना समाजातील लोकाना मदत करताना आढळतो,पर्यावरणा बाबत विविध उपक्रमांत सहभागी झालेला दिसतो आजचा विद्यार्थी म्हणजे उद्याचा वैज्ञानिक, नेता, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, उद्योजक आणि समाजनिर्माता. त्याच्यात अपार ऊर्जा आणि बुद्धिमत्ता आहे; फक्त ती योग्य दिशेने वापरण्याची गरज आहे.कारण मोबाइल आणि सोशल मीडियाचे व्यसन,वाढती स्पर्धा आणि मानसिक ताण,मूल्यांपासून दुरावा,,निसर्गाशी तुटत चालले असलेले नाते,रोजगार मिळवण्याची अनिश्चितता या सगळ्यामुळे काही विद्यार्थी गोंधळलेले आणि दिशाहीन वाटतात. त्यामुळे मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज बनली आहे. आजच्या विद्यार्थ्याने राष्ट्राभिमान, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा स्वीकार करावा. त्याच्याकडे ज्ञानासोबत संस्कारही हवेत. 'डिजिटल इंडिया'चा भाग बनताना 'संवेदनशील मानव' म्हणूनही तो घडला पाहिजे.

# पैनगंगा नदीवरील प्रस्तावित बॅरेज लवकरात लवकर पूर्ण करावेत !-लखनसिंह ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर**

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री, गिरीश महाजन यांच्याकडे लखन सिंह ठाकुर यांनी पैनगंगा नदीवर होत असलेल्या बंधाऱ्याचे मॅरेजेस मध्ये रूपांतर लवकरात लवकर करावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. त्यामध्ये धोडप भापूर बालखेड मसलापेन, आसेगावपेन प्रस्तावित बॅरेज मध्ये धोडप व भापूर करिता पाणी मिळणे शक्य आहे याबाबत चर्चा करण्यात आली.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील को. प. बंधाऱ्याचे बॅरेजेस मध्ये रूपांतरित करुन धोडप व भापूर करिता पाणी उपलब्धता मिळणे शक्य आहे. याबाबत राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली

वाशिम जिल्हयातील रिसोड तालुका हा सिंचनाचे बाबतीत अत्यंत मागासलेला वाशिम जिल्हा आहे. विकासाचे दृष्टीने को. प. बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर केल्याशिवाय पर्याय उपलब्ध नाही. यापूर्वी तात्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन मंत्री असतांना रिसोड येथे लखन सिंग ठाकूर यांच्या निवासस्थानी भेट दिली होती त्यादरम्यान रिसोड येथील अनेक वर्षापासून रखडलेला पळसखेड धरण प्रकल्प बंद अवस्थेत होता. त्याची तात्काळ दखल घेऊन पळसखेडा पाटबंधारे प्रकल्पाला गती देण्याचा आणि सुरुवात करण्याचे काम मंत्री महोदयांनी केले होते.त्यानुसार पळसखेडा लपा योजनाचे काम पूर्णत्वास नेले .सध्या पाणीसाठा उपलब्ध झाला याबाबत लखन सिंह ठाकुर यांनी त्यांचे आभार व्यक्त करून त्यासोबतच वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवरील धोडप, भापूर, मसलापेन, बालखेड, व आसेगांवपेन या ५ (पाच) को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजेसमध्ये रुपांतरण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची फार पुर्वीपासूनची मागणी असून वरील को.प. बंधाऱ्याचे रूपांतरणकरीता बराच पाठपुरावा लखन सिंग ठाकूर



करत आहे. परंतु या प्रकल्पांकरीता पाणी उपलब्धता नसल्यामुळे प्रकल्पांचे प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार असूनही सदर प्रकल्प रखडलेले आहेत. व रिसोड तालुका सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत मागासलेला तालुका असल्याबाबत त्यांच्या निदर्शनात आणून देण्यात आले त्याकरिता

वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील मंगळसा हा प्रकल्प 2023 मध्ये रद्द झाला आहे. तथापि, गोदावरी पाणी विवाद न्यायधिकरणाने तसेच राज्य एकात्मिक जल आराखडा नुसार पाणी वाटप हे संपूर्ण पैनगंगा उपखोरेसाठी राखीव ठेऊन पैनगंगा, पुस, अरुणावती व कयाधू या उप खोऱ्यासठी स्वतंत्रपणे वितरित केले नसल्याने मंगळसाचे प्रमाणित पाणी 4.64 दलघमी व पैनगंगा नदीवर अस्तित्वात असलेले मूळ धोडप व भापुर या को.प. बंधा-याचे प्रमाणित पाणी वळते करून धोडप व भापुर बॅरेजसाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देणे शक्य आहे. करीता या निवेदनाद्वारे विनंती की, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांना याबाबत निर्देशित करण्यात यावे याबाबत निवेदनाद्वारे लखन सिंह ठाकुर यांनी विनंती केली आहे .या निवेदनाच्या प्रती

मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक ,

कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना देण्यात आल्या.

# सिद्धांतची खोपोली नगरपरिषद शाळेला भेट

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** शिक्षण हाच खरा धर्म" हा वारसा जपणारी आणि "शिकाल तर टिकाल" हा संदेश देणारी संस्था म्हणजे सिद्धांत सेवा संस्था. संस्थेच्या वतीने खोपोली नगरपरिषद शाळा क्रमांक ५, मुळगाव- ठाकूरवाडी या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना नवीन साऊंड सिस्टम व विविध शालेय साहित्यांचे वाटप करून जागतिक शिक्षक दिन साजरा करण्यात आला




सिद्धांत सेवा संस्थेच्या विविध उपक्रमातील हा शैक्षणिक उपक्रम राबवताना शाळेतील गरजू , होतकरू , आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. लोणावळा येथील हॉटेल व्यवसायिक श्री राज पाटील* यांच्या माध्यमातून शाळेला आधुनिक साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली. तसेच हॉटेल व्यवसायिक *श्री यश राज पाटील व एस व्ही ग्रुपचे श्री राजेश शहा* यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना लोणावळा चिक्की व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी *खोपोली नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे व श्री मोहन अवसरमल तसेच माजी नगरसेवक किशोर पानसरे, राजू डुमने, संजय पाटील, रायगड प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष श्री प्रशांत गोपाळे व सिद्धांत सेवा संस्थेचे संस्थापक व पत्रकार श्री जगन्नाथ (भाई) ओव्हाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धांतचे श्री विजय कोळी हे होते

सिद्धांत सेवा संस्थेचे उपाध्यक्ष श्री. शशिकांत गोरड* यांनी आपल्या प्रस्तावनेतून संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेताना एस. टी. कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेली ही संस्था गेली पंधरा वर्षे सातत्याने असे शैक्षणिक उपक्रम राबवताना आदिवासी भागात आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. संस्थेचे सचिव श्री मिलिंद जाधव यांनी "शिक्षण म्हणजेच संस्कार आणि संस्कार म्हणजेच प्रगती" असा विचार मांडत शालेय शिक्षण उपक्रमामध्ये यापुढे देखील संस्थेच्या वतीने भरीव काम करण्याची भूमिका विषद केली. *संस्थेचे अध्यक्ष श्री विजय कोळी यांनी सामाजिक कार्यात काम करत असताना योग्य लोकांपर्यंत मदत पोहोचवणे हे संस्थेचे उद्दिष्ट असून यापुढे देखील संस्थेच्या वतीने योग्य ती मदत केली जाईल असे आश्वासित केले. त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्र पूरग्रस्त परिस्थितीमुळे हतबल झालेल्या शेतकरी वर्गाला देखील दिलासा देण्याकरिता संस्थेच्या वतीने एक जबाबदारी म्हणून लाखाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याबाबत लवकरच एक उपक्रम हाती घेतला जाईल,असे आश्वासित केले. या कार्यक्रमाला स्थानिक मान्यवर प्रतिनिधी सह सिद्धांत सेवा संस्थेचे पदाधिकारी श्री गजानन गायकवाड, अरुण दुष्मीकर, विनायक यादव, दिनेश कदम, राहुल जाधव, विशाल वाघमारे, शैलेश मेस्त्री, अशोक ठाकूर*, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतोष म्हस्के सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष धानिवले सर यांनी केले.

# मराठी भाषेचा इतिहास मोठा असून ती संवर्धन करणे काळाची ! : मनोहर जामकर सर


**दैनिक युंवकआधार**

**उरण शहर प्रतिनिधी सायली साळूंके**

मराठी शब्द आणि अंक सुलेखनाचे गाढे अभ्यासक मनोहर जामकर सर यांनी उरण नगरपरिषदचे मॉसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालय येथे लायब्ररी आणि अभ्यासिके मधील विद्यार्थ्यांना जुनी बाराखडी आता शासन निर्णयानुसार नव्याने 4 शब्द अधिकचे समाविष्ट करून सोळाखडी चे प्रदर्शनीच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रात्यक्षिके विविध ईस्ट्रूमेंटच्या सहाय्याने प्रत्यक्ष सुलेखन करून घेतले या वेळी विद्यार्थ्यांनी अतीशय उत्तम व उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

यावेळी मनोहर जामकर सर यांनी मराठी भाषेचा इतिहास समजावून दिला आणि मराठी भाषाही अनादीकाला पासून असून संत ज्ञानेश्वरानी मराठी भाषेलाएक वेगळी ओळख करून दिली त्या मराठी भेषाचा वसा सांभाळण्याची आपली जबाबदारी असून ती वृद्धिंगत करण्यासाठी आपला सर्वांचा सहभाग नक्की मिळेलच ही अपेक्षा व्यक्त केली. उरण नगरपरिषदचे मॉसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालयाच्या वतीने नियमित पणे अशा प्रकारचे चांगले उपक्रम उरण नगरपरीषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबिविले जातात त्याची अमलबजावणी नियमितपणे ग्रंथपाल संतोष पवार व त्यांचे सहकारी जयेश वत्सराज हे करतात, आजचा उपक्रम अत्यंत महत्वाचा आणि जवळचा आहे म्हराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ती साठी गरजेचा आहे, मराठी भाषेचा इतिहास मोठा असून ती संवर्धन करणे काळाची आहे.असेशेवटीश्री जामकर सिरानी सांगितले.

या उपक्रमाला मराठी आणि बिगर मराठी विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.यावेळी मनोहर जामकर सर यांचा सत्कार ग्रंथपाल संतोष पवार व सहकारी जयेश वत्सराज यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी ॲड. पल्लवी जगदाळे,ॲड. निरंतर सावंत, दिपक वायदांडे, चेतन सोदारी, अलंकार म्हात्रे, नाझीया शेख, नंदन पानसरे,हर्षवर्धन पवार, कल्पेश देवरे, डॉ प्रतिक टोगे, रश्मी म्हात्रे, जय दाभोळकर, सारा पवार, जय वत्सराज व साहिल सैनी हे उपस्थित होते.



# सद्गुरु साखर कारखान्याने दीपावली सणामध्ये रुपये 150 दिलेल्या हप्त्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये वाढला उत्साह"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-**

सद्गुरु श्री श्री साखर कारखान्याने सन२०२४-२५ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाला दिपावलीनिमित प्रतिटन १५०/-रुपये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये टाकून पूर्वी दिलेले रु. २८५० व असे एकुण रु. ३००० दर दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये दीपावलीच्या सणानिमित्त आनंदामध्ये अत्यानंद निर्माण केल्याच्या प्रतिक्रिया अनेक शेतकरी बांधव बोलून दाखवत आहेत. काही शेतकऱ्यांनी दूरध्वनी वरून आभारी व्यक्त केले. त्याला प्रतिक्रिया म्हणून माननीय चेअरमन एन शेषागिरी रावसर व व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर उदय जाधव व सर्व संचालक मंडळांनी शेतकरी बांधवांना आश्वासित केले की, आपण आपल्या सद्गुरु श्री .श्री. साखर कारखान्याच्या आत्तापर्यंत आलेल्या संकटाच्या काळात सहकार्य केलेले आहे हेच सहकार्य भविष्यकाळामध्ये सुद्धा तुम्ही आम्हाला द्याल अशी अपेक्षा असून आम्हीही सद्गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या विचारप्रणाली जोपासून "सेवा निसर्गाची उन्नती आपली"या ध्येयाने प्रगतीच्या मार्गाकडे



आपल्या सर्व शेतकरी बांधवांच्या विकासाचा रथ पुढे नेत सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यामध्ये नव्या पर्वाला सुरुवात करूयात, अशा प्रकारचे उद्गार काढले. ऐन दीपावलीच्या सणामध्ये शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरती हास्य फुलवल्याच्या प्रतिक्रिया अनेक जणांच्या येत असल्याचे समजते. तर ठीक ठिकाणी आनंदही व्यक्त केल्याचे समजते.

# खारघरचे पाणी तळोजाला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**

खारघर वसाहतीतील 40 सेक्टरना दररोज 75 एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे; पण शहराला 72 एमएमएलडीच पाणीपुरवठा होत असून तळोजा वसाहतीला खारघरचे पाणी दिले जात असल्याने रहिवाशांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.स्वतःच्या मालकीचे धरण असूनही सिडको अखत्यारीत शहरांना पाणीपुरवठा करताना अडचणी येत आहेत. पनवेल महापालिकेत येणाऱ्या खारघरला पाणीपुरवठा करण्याचे काम सिडकोतर्फे केले जाते.

सिडकोच्या हेटवणे, एमजेपी आणि नवी मुंबई पालिकेच्या मोरबे धरणातून शहराची तहान भागते. सध्यस्थितीत शहराला 75 एमएलडी पाण्याची गरज आहे; पण खारघरला सध्या 72 एमएलडी पाण्याचा पुरवठा होत आहे; पण आठवड्यातून किमान तीन ते चार दिवस शहराला पाणीपुरवठा होत नसल्याची ओरड आहे. व्हॅलिशिल्प, स्वप्नपूर्ती अशा मोठ्या गृहसंकुलांना फटका बसत आहे. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी सिडको तसेच रायगड भवन येथे हंडा मोर्चा काढत महिलावर्गाने अधिकाऱ्यांना फैलावर घेतले होते. त्यानंतर काही दिवस पाणीपुरवठा सुरळीत झाला होता; पण पुन्हा तीच परिस्थिती उद्भवत असल्याने रहिवाशांमध्ये संतापाची लाट आहे. खारघर शहराची व्याप्ती वाढत आहे. ओवा आणि पेठ गावांपासून 30 ते 36 सेक्टरपर्यंत शहर विस्तारलेले आहे. या भागात 12 पासून 42 आणि 52 मजल्यांपर्यंत उंचीच्या नवीन इमारती आहेत. खारघर सेक्टर 37, 40 आणि 42 मध्ये इमारतींची कामे सुरू आहेत. या इमारतीही 14 मजल्यांपेक्षा अधिक उंचीच्या आहेत; परंतु नव्या जलवाहिन्या आणि अतिरीक्त पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना सिडकोने तयार केलेली नाही.खारघरनंतर तळोजा नोडमध्ये सुमारे 25 हजार घरे तयार केली आहेत. अलीकडच्या काळात 15 हजार विक्रीकरिता उपलब्ध केली होती; मात्र तळोज्यामध्ये तयार केलेल्या गृहप्रकल्पांना पाणीपुरवठा होत नसल्याने अनेक ग्राहकांनी सिडकोच्या तळोजामधील घरांकडे पाठ फिरवली आहे. या भागातील रहिवासी सोसायट्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठ्याची नामुष्की सिडकोवर आली आहे. दुसरीकडे व्हॅलिशिल्प, स्वप्नपूर्ती सोसायट्यांमध्ये आठवड्यातून चार दिवस पाण्याची बोंब असल्याने अनेकांवर घरांच्या विक्रीची वेळ आली आहे.

टँकरचे भाव वधारले

खारघर, तळोजा नोडमध्ये आठवड्यातून किमान चार दिवस पाणीपुरवठा होत नाही. शहरातील जलकुंभ पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी दर आठवड्याच्या सोमवारी शटडाऊन घेतला जातो. सोमवारी कमी दाबाने पाणीपुरवठा होता. त्यानंतर खारघरला सात दिवस पाणी देता येते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले; परंतु आठवड्यातून चार दिवस पाणी येत नसल्याने रहिवाशांवर टँकर मागवावा लागत आहे; पण 45 हजार लिटरच्या एका टँकरसाठी 25 ते 30 हजार रुपये मोजावे लागत असल्याने टँकरविक्रेत्यांकडून वाढीव दराने पाणी विकले जात आहे.

# पनवेल महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाचा "माझी वसुंधरा अभियान - हरित यशोगाथा सन्मान २०२५"

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानामध्ये सलग तीन वर्ष सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या राज्य वातावरणीय कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे, यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिकेस "माझी वसुंधरा अभियान - हरित यशोगाथा सन्मान २०२५ बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगांव, मुंबई येथे आज झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्यावतीने उप आयुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, माझी वसुंधरा सल्लागार युवराज झुरंगे यांनी हा सन्मान स्वीकारला.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नेतृत्वात सर्व थिमॅटिक क्षेत्रांमध्ये पनवेल महानगरपालिकेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तीन लाख ते दहा लाख लोकसंख्येच्या अमृत शहरे गटामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल दिनांक 14 ऑक्टोबर 2025 रोजी IFAT इंडिया च्या व्यासपीठावरती पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्य वातावरणीय कृती कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने संचालक अभिजीत घोरपडे यांनी हा माझी वसुंधरा अभियान - हरित यशोगाथा सन्मान २०२५ सन्मान पनवेल महानगरपालिकेचे प्रदान केला.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेने प्रभावी पावले उचलली आहेत. यामध्ये धूळ नियंत्रण, हवेची गुणवत्ता तपासणी आणि शुद्धीकरणासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करून शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांना स्वच्छ हवा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रभावी उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

फॉग कॅनन वाहने

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ४ फॉग कॅनन वाहनांची (Fog Cannon Vehicle) नेमणूक करण्यात आली आहे. ही वाहने दररोज विविध प्रभागांमध्ये कार्यरत राहून धूळकणांचे नियंत्रण करतात. फॉग कॅननच्या साहाय्याने सूक्ष्म पाण्याच्या फवारणीद्वारे वातावरणातील धूळकण कमी केले जातात, ज्यामुळे नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास कमी होतो.

याशिवाय, एअर मॉनिटरिंग व्हॅन च्या माध्यमातून शहरातील विविध भागांतील हवेची गुणवत्ता (Air Quality Index - AQI) नियमितपणे मोजली जाते. या व्हॅनद्वारे हवेत असणाऱ्या विविध घटकांची तपासणी दररोज करण्यात येते, ज्यामुळे प्रदूषणाची अचूक पातळी समजते आणि त्यावर उपाययोजना करता येतात.

प्रस्तावित व सुरू असलेली कामे

पनवेल महानगरपालिका लवकरच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी १० एअर प्युरिफिकेशन सिस्टीम्स बसविणार आहे. या प्रणालीमुळे हवेत असलेले सूक्ष्म प्रदूषक कण शोषले जाऊन वातावरण अधिक स्वच्छ राहील. हे प्रकल्प नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी अत्यंत आवश्यक मानले जात आहेत.

तसेच, रिअल टाइम एम्बियंट एअर क्वालिटी मॉनिटरिंग सिस्टीम आणि डिस्प्ले बोर्ड बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या यंत्रणेद्वारे औद्योगिक व निवासी भागांमधील हवामानाची गुणवत्ता सतत मोजली जाईल आणि त्याची माहिती थेट नागरिकांना डिस्प्ले बोर्डवर पाहता येईल.

पनवेल महानगरपालिकेचे हे प्रयत्न शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे हा या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे

# मराठा महासंघ मुंबई विभाग जम्बे कार्यकारिणी जाहीर मुंबई अध्यक्षपदी रुपेश मालूसरे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रविणभाऊ पवार**

मुंबई उपरोक्त संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकी निर्णयानुसार मुंबई, जिल्हा व तालुकास्तरावर नियुक्ती करण्याचे आपण काम करण्यात आले. दि. १२ सप्टेंबर २०२५ झालेल्या बैठकीत मुंबई, जिल्हा व तालुका स्तरावरील काही निवडक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.



रुपेश मालूसरे- मुंबई अध्यक्ष, एड.धर्मराज जाधव -महामुंबई अध्यक्ष, शंकर मोहिते- उपाध्यक्ष, प्रताप शिर्के -उपाध्यक्ष, अशोक देसाई -उपाध्यक्ष, महेंद्र तावडे -उपाध्यक्ष, संतोष साळवी- उपाध्यक्ष, सुजय पाटील - उपाध्यक्ष, भालचंद्र धुरी - सचिव, भालचंद्र दळवी -सचिव, संदिप देसाई- सचिव, प्रकाश म्हाब्दी -कोषाध्यक्ष, संतोष जाधव -सहसचिव, संजय दळवी -सहसचिव, सुधीर दळवी - सहसचिव, स्मिता साळवी मुंबई महिला अध्यक्षा, सुभाष बामणे मुंबई शैक्षणिक प्रमुख, एड. रघुनाथ गावडे- मुंबई लिगल प्रमुख पदी नियुक्ती यांची करण्यात आली

तसेच मुंबई च्या सहा जिल्हाध्यक्ष पुढीलप्रमाणे अजित कदम- दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष, सचिन शिंदे- दक्षिण मध्य जिल्हाध्यक्ष, सतिश जाधव- उत्तर मध्य जिल्हाध्यक्ष, संतोष शिंदे- उत्तर पश्चिम जिल्हाध्यक्ष, पोपट मांढरे -उतर मुंबई जिल्हाध्यक्ष, सचिन निकम- इशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आल्या आहेत.त्याचबरोबर मुंबईतील तालुका प्रमुख पदी काही नियुक्त्या करण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे सचिन पवार वांद्रे पूर्व तालुका अध्यक्ष, सुरेश शिंदे विलेपार्ले तालुका- अध्यक्ष, संदेश भोसले - चारकोप तालुका अध्यक्ष, दिलीप घोरपडे भांडूप तालुका अध्यक्ष, अनिकेत घोडेकर मुलुंड तालुका अध्यक्ष, विकास भोसले चेंबूर तालुका अध्यक्ष, अजित मोरे अनुशक्ती नगर तालुका अध्यक्ष, प्रकाश प्रभु सायन धारावी तालुका अध्यक्ष अशी ही मुंबई जब्बो कार्यकारिणी आहे

मुंबई रुपेश मालूसरे यांनी सांगितले की, आतापर्यंत ज्या समाज बांधवांच्या नियुक्ती झाल्या आहेत. त्यांना राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रकाश देशमुख यांच्या सहीनीशी नियुक्ती पत्र देण्यात येईल. त्याचबरोबर त्यांनी सांगितले की, ज्या नियुक्ती झालेल्या सर्व पदाधिकार्यांनी आपण राहत असलेल्या विभागात अखिल भारतीय मराठा महासंघाचे समाजकार्य सुरू करावे.

तसेच आणखी काही नियुक्त्या नियोजित असून लवकरच म्हणजे दिपावली नंतर त्यावर चर्चा होऊन सदर नियुक्त्या अंतिम स्वरूपात आणण्यात येतील. मुंबई अध्यक्षांनी सर्व बांधवांना येणाऱ्या दिपावली सणाच्या खुप खुप शुभेच्छा दिल्या आहेत.

# दिवाळीच्या खरेदीत सावधान! शिरपूर पोलीस निरीक्षक केशव वाघ यांचे नागरिकांना आवाहन.!

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**शिरपूर:-**दिवाळी सण जवळ येत असल्याने शिरपूर शहरातील बाजारपेठा, गल्ली -बोळ आणि चौकांमध्ये खरेदीची लगबग वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शिरपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केशव वाघ यांनी नागरिक, दुकानदार आणि वाहन चालकांना संपर्क तेचे व जबाबदारीचे विशेष आवाहन केले आहे सणासुदीच्या काळात बाजारपेठेत प्रचंड गर्दी होत असल्याने काही लुटारू, पाकीट मार टोळ्या आणि संधी साधू घटक सक्रिय होतात त्यामुळे नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू मोबाईल, पर्स व दागिने यांची विशेष काळजी घ्यावी संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल दिसले असतात काय पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक केशव वाघ यांनी केले त्याचबरोबर फटाके विक्रेत्यांना देखील सूचना देण्यात आले आहेत की त्यांनी आपली दुकाने परवाना असलेल्या सुरक्षित ठिकाणी लावावीत बिडी ,सिगारेट, अगरबत्ती अशा वस्तूंचा वापर फटाक्यांच्या दुकानाजवळ करू नये, कारण यामुळे अंडी चा धोका संभवतो पोलीस निरीक्षक वाघ यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला शहरातील अनेक दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सणासुदीच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरू शकतात या कॅमेरा मधील फुटेज मुळे चोरी, कुमारी किंवा गर्दीत गोंधळावर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत मिळते त्यामुळे सर्व विक्रेत्यांनी हे कॅमेरे कार्यरत ठेवावे आणि नियमित तपासणी करावी.

तसेच वाघ साहेब यांनी वाहन चालक यांनाही इशारा देत सांगितले की, बाजारपेठामध्ये अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी जड वाहने व चार चाकी वाहने गर्दीच्या रस्त्यावर आणू नयेत टू -व्हीलर चालक आणि वाहन बाजूला उभे करताना इतरांच्या अडथळयाचा विचार करावा तसेच रोडच्या मध्यभागी किंवा खरेदीच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची गाडी किंवा स्टॉल लावू नयेत, अन्यथा वाहतुकीत गोंधळ निर्माण होऊन अपघाताचा धोका संभवतो सणासुदीच्या




काळात पोलीस प्रशासनाने कायदा सुव्यवस्था आणि अग्निसुरक्षासाठी नियुक्त केली असून, शहरातील प्रमुख चौकात पोलीसग्रस्त वाढविण्यात आली आहे. तसेच पोलीस निरीक्षक शिरपूर.केशव वाघ यांनी नागरिकांना केले आवाहन.

# विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, भारत, संस्थेतर्फे पणजीत हृद्य कार्यक्रम

## गोमंतकीय साहित्यिकांच्या लेखनावरील तीन पुस्तकांचे प्रकाशन; सहकारमंत्री सुभाष शिरोडकर यांचीही उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पणजी प्रतिनिधी** : ''समाजाच्या भल्यासाठी, आपण समाजाचे देणे लागतो, हा विचार समोर ठेवून विधायक कार्याच्या आधारे आपण कार्यरत राहायला हवे. देशात विधायक कार्यासाठी केवळ राजकीय पक्षच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेनेही सहभाग घ्यायला हवा, तरच विधायक कार्य समाजाचा विकास शक्य आहे. लोकसहभाग असल्याशिवाय सामाजिक प्रगती किंवा विकास हा अशक्य असतो'', असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या नव तथा अक्षय ऊर्जा मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री तथा उत्तर गोवा खासदार श्रीपाद नाईक यांनी काढले.




पुणे येथून कार्यरत असलेल्या 'विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, भारत'तर्फे इन्स्टिट्युट मिनेझीस ब्रागांझाच्या संयुक्त विद्यमाने पणजी येथील आय.एम.बी. सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या हृद्य कार्यक्रमात विश्वशांती पुरस्कार प्रदान करून देशभरातील दहा मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारमूर्तीमध्ये गोव्यातील पाच जणांचा समावेश होता. यावेळी गोमंतकीय साहित्यिकांच्या लेखनावरील तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. कविसंमेलनात गोव्यातील प्रतिभावंत कवींचा चांगल्यापैकी प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला सहकारमंत्री सुभाष शिरोडकर यांचीही उपस्थिती लाभली होती.

या कार्यक्रमात 'कोकण मराठी परिषद, गोवाचे अध्यक्ष सुदेश आर्लेकर यांना विश्वशांती साहित्य गौरव पुरस्कार, साहित्यिक तथा उद्योजक गुरुदास नाटेकर यांना विश्वशांती साहित्य गौरव पुरस्कार, गोव्यातील चित्रपट अभिनेते तथा नाट्यदिग्दर्शक नितीन कोलवेकर यांना विश्वशांती कला गौरव पुरस्कार, समाजसेविका खतिजा खान यांना आदर्श महिला पुरस्कार, तर पांडुरंग गावकर यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच, छत्तीसगड येथील सुनीता रहाटे यांना समाजरत्न पुरस्कार, छत्रपती संभाजीनगर येथील कृष्णा गुंड यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार, निशांत निटवे यांना समाजरत्न पुरस्कार, विलास माळी यांना कृषिरत्न पुरस्कार, तर दत्तात्रय कांबळे यांना शिक्षकरत्न पुरस्कार देण्यात आला.

व्यासपीठावर उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे गोवा स्वातंत्र्यसेनानी संघाचे अध्यक्ष रोहिदास दाद देसाई यांच्यासह कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. एच.एल. नाईक उपस्थित होते. याशिवाय प्रख्यात गोमंतकीय शल्यचिकित्सक आणि हृदयरोगतज्ज्ञ डॉ. दिगंबर नाईक, कवी अफसर शेख, साहित्यिक गजानन देसाई, ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते आणि लेखक राजेंद्र केरकर, ॲड. महेश राणे, मराठी राजभाषा समितीचे विनोद पोकळे, समाजसेविका आणि प्राध्यापिका बिना नाईक, ॲड. एन डी पाटील, विश्वशांती बहुउद्देशीय संस्था, भारत या संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयभाऊ चौधरी, मिनेझीस ब्रागांझा संस्थेचे सचिव अशोक परब इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. रेखा पौडवाल यांनी संपादन केलेल्या 'पाऊस' या कवितासंग्रहाचे, तसेच संपादन केलेल्या 'गोमंत वैभव' आणि 'गोमंत लोकसंचित' या तीन पुस्तकांचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्रद्धा गवंडी यांनी पुस्तकांविषयी स्वतमचे मनोगत व्यक्त केले. प्रा. गौरी नाडकर्णी यांनी तिन्ही पुस्तकांवर भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री आणि शिक्षिका अक्षता किनळेकर -मडगावकर यांनी केले. आभार प्रकटन कवयित्री आणि लेखिका डॉ. रेखा पौडवाल यांनी केले.

आपल्या संबोधनात पुढे बोलताना मंत्री श्रीपाद नाईक यांनी, २०४७ पर्यंत भारताला संपूर्ण विकसित राष्ट्र बनवण्याच्या माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यात सर्वांनीच हातभार लावायला हवा, असेही मत व्यक्त केले. राज्याचे सहकारमंत्री तथा शिरोड्याचे आमदार सुभाष शिरोडकर यांनीही या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना अशा प्रकारच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांनी एकमेकांना भेटणे आवश्यक असून, सामाजिक घटकांची सेवा होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. कवी संमेलनाच्या माध्यमातून कवी समाजमनात वादळ निर्माण करू शकतो व त्यामुळे कविता आणि साहित्यविषयक कार्यक्रम होणे काळाची गरज आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात संजयभाऊ चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनावेळी व्यासपीठावर अप्सर शेख, ॲड. एन डी पाटील, अजितसिंह राणे, व इतर मान्यवरांची उपस्थिती होती. त्या सत्राचे सूत्रसंचालन नूतन दाभोळकर यांनी केले. यावेळी पूजा गावकर, उल्का काकडे, माधुरी उसगावकर, सुलभा सावंत देसाई, रेखा पौडवाल, सोनाली पेडणेकर, सुभाष शहा, रेखा डायस, शर्मिला प्रभु, नूतन दाभोळकर, सविता गिरोडकर, वनिता नार्वेकर, मानसी जामसंडेकर, शोभा धामस्कर, पौर्णिमा देसाई, वर्षा साठे-शिंत्रे, मोहिनी हळर्णकर, अक्षता किनळेकर, श्रद्धा गवंडी, प्रांजली चौधरी, अशोक लोटलीकर, लक्ष्मी महात्मे, शीतल साळगावकर, प्रकाश ढवण, सोनिया शहा, विंदा नाईक, उदय ताम्हणकर, उमेश शिरगुप्पे, सनिता पेडणेकर, चित्रा क्षीरसागर, किरण कामत, सुश्मिता गावकर, डॉ. आरती दिनकर, चित्रा क्षीरसागर यांनी कविता सादर केल्या. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन नूतन दाभोळकर यांनी केले व रेखा डायस यांनी आभार मानले या कार्यक्रमांचे आयोजन श्रीसाई प्रतिष्ठाण पुणे या संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रेखा पौडवाल, सविता गिरोडकर, शोभा धामस्कर, शर्मिला प्रभू, नूतन दाभोळकर, रेखा डायस यांनी परिश्रम घेतले.

---

## महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन स्पर्धेत रायगड संघाच्या मुलींची चमकदार कामगिरी: अंडर 17 मध्ये विजेतेपद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन स्पर्धेत रायगडच्या अंडर-17 मुलींनी चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावला.




बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड (बीओआर ) मुलींच्या संघाने "योनॅक्स-सनराई आमदार स्व. अरुणकाका बालभिमराव जगताप स्मृती महाराष्ट्र सब-ज्युनिअर आंतर जिल्हा (अंडर 17) आणि अंडर 15 व अंडर 17) राज्य बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ही स्पर्धा अहिल्यानगर येथे पार पडली.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील खेळाडूंच्या सहभागामुळे ही राज्यातील सर्वाधिक स्पर्धात्मक स्पर्धापैकी एक ठरली. रायगड संघाकडून उत्कृष्ट कौशल्य, संघभावना आणि जिद्दीने खेळ करणाऱ्या खेळाडूंमध्ये कु. गाथा सूर्यवंशी, कु. अनुष्का एप्टे, कु. आयुषी निरवाण, कु. ऋधिमा म्हात्रे, कु. अनरिया सिंग आणि कु. अनन्या सिंग यांचा समावेश होता.

या यशामागे प्रशिक्षक श्रीशैल मिटकरी आणि संघव्यवस्थापक प्रशांत मुखर्जी यांचे मार्गदर्शन आणि मेहनत मोलाची ठरली.

संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, तसेच बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष परेश ठाकूर, उपाध्यक्ष रविंद्र भगत, शिवकुमार करयिल यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

रायगड बॅडमिंटनसाठी हे यश आणखी एक अभिमानास्पद पर्व ठरले असून, या खेळात जिल्ह्याची वाढती ताकद आणि गुणवत्ता अधोरेखित करणारे आहे.

---

## पत्नीसह सासू राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने तक्रार दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पत्नीसह सासू राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने त्या दोघी हरविल्याची तक्रार पतीने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे.

नारायण पाटील (55 रा.डेरवली) यांची पत्नी जयश्री पाटील (46) व सासू हौशाका विठ्ठल कोकणे (68) या दोघी राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने त्या दोघी हरविल्याची तक्रार पतीने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. जयश्री पाटील या अंगाने मजबूत, चेहरा गोल, केस काळे, वर्ण गोरा, डोळे काळे, नाक सरळ, उंची 5 फुट असून, डाव्या गालावर तिळ आहे. त्यांच्या अंगावर लाल रंगाचा गाऊन, गळयात सोन्याचे मंगळसूत्र व मोबाईल फोन आहे. तर हौशाका कोकणे या अंगाने सडपातळ चेहरा उभट, केस पांढरे, वर्ण गोरा, डोळे काळे, नाक सरळ, उंची 5 फुट असून डाव्या गालावर तिळ आहे. त्यांच्या अंगात हिरव्या रंगाची सहावारी नक्षीची साडी घातलेली आहे. या दोघींबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.हवा.अण्णासाहेब हसबे मो.क्र.9867136876 येथे संपर्क साधावा.

---

## पनवेल परिसरातील बळीराजाने सुरू केली भात कापणीला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल परिसरातील असलेल्या शेतजमिनीवर यंदा भात पिक कापणी योग्य तयार झाले असून कापणीला सुरुवात झाली आहे. या कापणीतून हजारो हातांनाआता महिनाभर काम मिळणार आहे. विशेष म्हणजे आदीवासी वाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे दालन खुले झाले आहे.

वाढत्या औद्योगिकीरणासह उत्पादन कमी येत असल्याने भात शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस भात पिकांचे क्षेत्र कमी होऊ लागले आहे. खर्च अधिक आणि उत्पन्न कमी या नकारात्मक विचारामुळे अनेकांनी शेती करण्याकडे दुर्लक्ष करून मुंबई, पुणेकडे नोकरी करण्यावर भर दिला आहे. तर, काही ठिकाणी औद्योगिकीकरणामुळे जमीन संपादन प्रक्रीया वाढू लागली आहे. अनेकांच्या पिकत्या जमीनी प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आल्या असून काही ठिकाणी त्या घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतीचे क्षेत्र घटले आहे. दहा वर्षांपुर्वी 1 लाख 24 हजार हेक्टर क्षेत्र होते. मात्र, दोन वर्षांपूर्वी हेच क्षेत्र 94 हजार हेक्टर इतके होते. यावर्षी या क्षेत्रात 10 हजार हेक्टरने घट झाली आहे. त्यामुळे यावर्षी जिल्ह्यामध्ये 84 हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात पिकांची लागवड करण्यात आली होती. त्यात कोलम, सुवर्णा, रत्ना अशा अनेक पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. आता पावसाचा हंगाम संपला असून भात शेती बहरू लागली आहे. कापणीयोग्य पिक झाल्याने शेतकऱ्यांनी गेल्या चार दिवसांपासून कापणीला सुरुवात केली आहे.

दुपारी ऊन लागत असल्याने पहाटेपासूनच भात कापणीला सुरुवात केली जात आहे. शेतकरी कापणीच्या कामाला लागला आहे. दिवाळीपुर्वी 30 टक्केहून अधिक क्षेत्रातील भात कापणी पूर्ण होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या भात कापणीतून ग्रामीण भागातील विशेष म्हणजे आदीवासीवाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. 300 रुपयांपासून कामगारांना मजुरी दिली जात आहे. महिनाभर ही प्रक्रीया सुरु राहणार असल्याने अनेकांच्या हाताला काम मिळणार आहे.

---

## पनवेल महापालिकेने चांगल्या दर्जाचे डांबरीकरण करावे निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करणाऱ्यांवर ठेकेदारांवर कारवाई करावी लिना गरड यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

खारघर मधील त्याच त्या वीस-बावीस ठिकाणी दरवर्षी खड्डे पडले होते. त्यासंबंधी महापालिकेला पत्रव्यवहार केला होता. त्याच ठिकाणी खड्डे पडतात आणि त्याच खड्ड्याची दरवर्षी डागडजी केले जाते. असे सात-आठ वर्षांपासून चालू आहे त्याबद्दल 2022 23 मध्ये महापालिकेला पत्रव्यवहार केला होता. तरीही परमनंट सोल्युशन न मिळाल्यामुळे, मायक्रो सर्वे करून 2024 मध्ये व्हिडिओ काढून महापालिकेला कळविण्यात आले होते. विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर 200-300 करोड रुपयांची कामे काढून सदर ठिकाणचे खड्डे बुजवण्याचे नाटक करण्यात आले. एवढेच नाही तर सिडको ने बनवलेल्या चांगल्या रस्त्यावर सुद्धा डांबरीकरणाचे काम महापालिकेकडून चार ठेकेदाराच्या माध्यमातून करण्यात आले. एक आठवड्यापूर्वी संपलेल्या पावसाळयात



वर उल्लेख केलेले वीस-बावीस ठिकाणी खड्डे तर पुन्हा पडले , याशिवाय ज्या चांगल्या रस्त्यावर डांबरीकरण केले होते, त्या रस्त्यावरील महानगरपालिकेच्या माध्यमातून चार ठेकेदारांनी केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे, संपूर्ण खारघर परिसर खड्डेमय झालेला आहे.

म्हणजे सिडको असताना ज्या रस्त्यावर खड्डे नव्हते, त्याच रस्त्यावर ठेकेदाराच्या फायद्यासाठी करण्यात आलेला डांबरीकरणामुळे नव्याने खड्डे पडलेले आहेत. म्हणजे आता खारघर मधील वीस-बावीस ठिकाणी नाही, तर सर्वच रोडवर खड्ड्याचे साम्राज्य तयार झालेले आहे.

महानगरपालिकेने चार ठेकेदारांना नोटीस देऊन अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या माध्यमातून चौकशी लावल्याचे समजले. परंतु महानगरपालिकेच्या कोणत्याच अधिकाऱ्याकडे आमदारांच्या कुटुंब आणि नातेवाईकांच्या कंपनीवर कारवाई करण्याची धमक नाही. त्यामुळे आज उत्सव चौक ते टाटा हॉस्पिटल या रोडवरील टी आय पी एल च्या माध्यमातून चालू असलेले, जे जे रसोई हॉटेल समोरील काम लीना गरड, बालेश भोजने, अनिता भोसले आणि टीम यांच्याकडून थांबविण्यात आले. महानगरपालिका अधिकाऱ्याला संपर्क केल्यानंतर ते हजर झाले आणि कोणत्याही परिस्थितीत नव्याने डांबरीकरण करण्यात आलेल्या खड्डेमय रस्त्यावर फक्त पॅचवर्क करून थुकपट्टी लावण्याचे काम करू नये असा इशारा देण्यात आला. त्यावर अधिकाऱ्याकडून पॅचवर्क न करता, संपूर्ण रोड नव्याने डांबरीकरण करण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. बघूया महानगरपालिकेचे अधिकारी सत्ताधारी लोकांशी संबंधित ठेकेदारांना कसे वटणीवर आणतात...

---

## जलकुंडानं साठवलं पाणी, शेती पिकणार सोन्यावाणी

### २५ गुंठ्यात एक ; ५२ हजार लिटरचा साठा ; शेतकऱ्यांसाठी वरदान योजना

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : कोकणात सर्वाधिक पाऊस पडत असला तरी, ऑक्टोबरपासून पावसाचे प्रमाण कमी होते. कातळ जमीन आणि छोट्या जमिनीच्या तुकड्यांमुळे शेतकऱ्यांना संरक्षित पाण्याचा लाभ मिळावा, या उद्देशाने पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या पुढाकाराने कृषी विभागाने राबविलेली 'कोकण जलकुंड' योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. कोकण म्हणजे पाऊस, आंबा-काजूच्या बागांचा सुगंध आणि लाली ल्यालेल्या जमिनीचा मृदगंध. पण, या पावसाळी प्रदेशातही जानेवारीनंतर पाण्याची कमतरता भासते. कातळ जमिनीमुळे मोठी शेततळे बांधणे अशक्य होते. अशा परिस्थितीत 'कोकण जलकुंड' ही योजना म्हणजे आशेचा नवा झरा ठरली आहे.*चिपळूण तालुक्यातील ढोक्रवली येथील *युवा शेतकरी राजेंद्र धाकटू गावकर* या योजनेबद्दल सांगतात,"माझे वडील धाकटू रत्ना गावकर यांच्या नावे असलेली शेती मी करतो. २०२४-२५ या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेत मला 'कोकण जलकुंड' मंजूर झाले. आता पावसाने ते तुडुंब भरले आहे. पूर्वी दीड-दोन किलोमीटरवरून पाण्याचे पिंप मोटरसायकलीवरुन वाहून आणावे लागे, पण आता



शेतातच पाणी साठवले गेले आहे. माझ्या काजू बागेला जीवन मिळाले आहे. कृषी विभागाच्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे."तालुका कृषी अधिकारी शत्रुघ्न म्हेत्रे सांगतात,"कोकणात पाऊस मुबलक पडतो, पण जानेवारीपासून पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. जलकुंडांमुळे आता ५२ हजार लिटरपर्यंत संरक्षित पाणी उपलब्ध होत आहे. या साठ्याचा सिंचन आणि फवारणीसाठी मोठा उपयोग होत असून, शेतकऱ्यांना थेट फायदा मिळतो आहे. चिपळूण तालुक्यात आतापर्यंत ६० जलकुंड पूर्ण झाली असून, सुमारे १० लाख रुपयांचा खर्च करण्यात आला आहे."जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले म्हणाले,"पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलकुंडांच्या माध्यमातून फायदा मिळाला आहे. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमधून ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. प्रत्येकी ५ मीटर लांब, ५ मीटर रुंद आणि २ मीटर खोल अशा या जलकुंडांत ५२ हजार लिटर पाणी साठते. २५ गुंठ्याला एक या प्रमाणे प्रती हेक्टर चार जलकुंड देता येतात. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी टिकून राहणार असून, त्यांच्या आयुष्यातील समृद्धीचा प्रवाह अखंड वाहत राहील."'कोकण जलकुंड' या योजनेमुळे कोकणातील प्रत्येक शेतात आता पाण्याचा खजिना साठला आहे. निसर्गाचा आशीर्वाद आणि कृषी विभागाचा प्रयत्न यांची सांगड घालून "जलकुंडाने साठवले पाणी, शेती पिकणार सोन्यावाणी!" हे वाक्य आज अक्षरशः खरे ठरत आहे

---

## दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दुग्धजन्य पदार्थांवर एफडीएची नजर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

सणासुदीच्या काळात मिठाई, फराळ आणि गोड पदार्थांची मागणी वाढते. मात्र, या काळात दुग्धजन्य पदार्थात भेसळ होण्याची शक्यता जास्त असल्याने अन्न व औषध प्रशासनाने सणासुदीसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे.

या मोहिमेचा उद्देश नागरिकांना चांगल्या प्रतिची मिठाई व फराळ उपलब्ध होणे हा आहे. मात्र, ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन एफडीए प्रशासनाने केले आहे. याशिवाय, मिठाईची मुदत संपण्याची ही तारीख त्यावर लिहावी असे आवाहन करण्यात आले आहे.

मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात, त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत 25 ऑक्टोबर 2025 पर्यंत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा या नावाने विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे. या मोहिमेत राज्यात नमुने गोळा कारण्यासोबत नागरिकांना प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न होणार आहेत. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. दुधामधून भेसळ रोखणे, पनीरसदृश्य अनालॉग वापर टाळणे आणि गुणवत्तेची नियमित तपासणी करणे या उपाययोजनांमध्ये समावेश आहे.

या माध्यमातून कोलेस्ट्रॉल वाढणे, वजन वाढणे आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ नयेत, असा प्रयत्न आहे. मोहीम दरम्यान नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी टोल-फ्री क्रमांक 1800-222-365 वर कळवता येतील.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुरवठा कमी आणि मागणी जास्त असतानाही भेसळ टाळण्यासाठी नागरिक, अन्न व्यवसायिक आणि शासनाने एकत्र काम करावे, असा आग्रह धरला.